। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २६८ वा । गुरूवार दिनांक ०८ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- येरमाळा पोलीस ठाणे जुगार विरोधी कारवाई दरम्यान येरमाळा पोलीसांनी येरमाळा पो ठाणे हद्दीत गौर येथील ग्रामपंचायत कार्यालय जवळ छापा टाकला. यावेळी कैलास रा. गौर ता. कळंब जि. धाराशिव हे १२.४५ वा. सु. गौर येथील ग्रामपंचायत कार्यालय जवळ कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण ९२० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले येरमाळा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

तसेच लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलीसांनी दि.०६.०१.२०२६ रोजी लोहारा पो ठाणे हद्दीत सास्तुर गावातील बस स्टॉप शेजारी छापा टाकला. यावेळी नसरुद्दीन रा. सास्तुर ता. लोहारा जि. धाराशिव हे २०.०० वा. सु. सास्तुर गावातील बसस्टॉप शेजारी कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण २,१५० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले लोहारा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-१२ (अ) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॉलीला धडकेत एकाचा मृत्यू

आंबी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे- भगवान भानुदास मासाळ, वय ५५ वर्षे, रा. बोर्डा ता. कळंब जि. धाराशिव व सोबत फिर्यादी नामे- शेषेराव माधव मिसाळ, वय ६३ वर्षे, रा. वंजारवाडी ता.भुम जि. धाराशिव हे दोघे दि.१६.१२.२०२५ रोजी १९.०० वा. सु. मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान खर्डा ते भुम जाणारे रोडवर आंतरवली पुलाजवळ भगवान यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही चालवून रोडवर उस भरुन उभ्या असलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला पाठीमागुन धडक देवून स्वत: गंभीर जखमी होवून मयत झाले. तर शेषेराव मिसाळ हे जखमी झाले. फिर्यादी नामे-शेषेराव मिसाळ यांनी दि.०६.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आंबी पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१),२८१, सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मारहाण करुन गंभीर जखमी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत विनायक इतर ११ इसम यांनी दि.०४. रोजी खंडोबा यात्रेत मैलापुर नळदुर्ग येथे फिर्यादी नामे-मुकुंद शेकुंबर जाधव, वय ३२ वर्षे, रा.बक्षी हिप्परगा ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांना गावातील मुलांचा खंडोबा मंदीरात घोड्याजवळुन आत मध्ये जावुन दर्शन करण्याचे कारणावरुन मारहाण करुन गंभीर जखमी केले. नोंदवला आहे.

## खुनाच्या गुन्हयातील एकास तामलवाडी पोलीसांनी केली अटक



धाराशिव (प्रतिनिधी)- खुनाच्या गुन्हयातील आरोपीस तामलवाडी पोलीसांनी केली अटक केली असून या प्रकरणी पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दिर भावजयीच्या अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या १३ वर्षीय मुलाचा कुऱ्हाडीने घाव घालून जिवे मारून प्रेत तलावाजवळ गवताखाली फेकून दिले सदरची घटना तुळजापुर तालूक्यातील तामलवाडी साठवण तलावानजिक ०५.०१.२०२५ रोजी उघडकीस आली. यावर तामलवाडी पोलीस ठाणे गुरनं ०४/२०२६ कलम १०३(१) हा दि.०६.०१.२०२६ रोजी गुन्हा नोदवला आहे.

सोलापुर धुळे राष्ट्रीय महामार्गावर तामलवाडी शिवारात कदम यांची शेती आहे ती शेती दत्ता हा बटईने करत होता. सदर ठिकाणी उमरगा तालुक्यातील कोळसुर येथील ओमकार हा भावजयीला घेवून सालगडी म्हणून कामास होता. भावजयी हीचा १३ वर्ष वयाचा मुलगा कृष्णा हा कधी वडीलाकडे गावी तर कधी तिचेकडे राहायचा. मुलगा कृष्णा हा चुलता व आई यांच्या अनैतिक संबधाची माहिती वडीलांना सांगत होता. कृष्णा हा दिर भावजयीच्या अनैतिक संबधात अडसर ठरू लागला होता. कृष्णा सर्व माहीती भाउ सदानंद याला सांगतो याचा राग ओमकार यास आल्याने त्याने चिडुन ०१ जानेवारी रोजी दुपारी च्या सुमारास तामलवाडी साठवण तलावामधील पाणी उपसा करणाऱ्या विद्युत पंम्पाचा पाईप बसवायचा म्हणून तलावामधे कृष्णा यास घेवून गेला. ओमकार याने कृष्णा यास कुऱ्हाडीचा घाव घालून जिवे ठार मारले व प्रेत गवता मधे फेकुन देवून तेथुन पसार झाला होता. तामलवाडी पोलीसांनी सदर घटनेची प्रथम अकस्मात मृत्यु नंबर ०२/२०२६ कलम १९४ बी.एन.एस.एस. अन्वये दाखल करुन सदर अमृ मध्ये मयताची ओळख पटवून गुन्हा दाखल करुन गुप्त बातमीदार व तांत्रीक विशलेषनावरुन ओमकार याचा शोध घेवून उमरगा तालूक्यातील काळसुर गावातून ताब्यात घेवून त्याचे कडे नमुद गुन्हे बाबत चौकशी केली त्यांनी सदरचा गुन्हे केल्याचे कबुली दिली.

सदरची कामगिरी . पोलीस अधिक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना, उप विभागीय पोलिस अधिकारी डॉ निलेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सपोनि गोकुळ ठाकुर, पोह-जुबेर काझी दिनकर तोगे, पोअं-सुरज नरवडे, उमेश माने, नजीर बागवान, चालक पोह- तुराब शेख, हनमंत कोरे, नितीन भोसले, यांनी केली आहे. अशी माहिती पोलिसाकडून मिळाली असून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## ६ वर्षांपासून बेपत्ता असलेल्या वृद्धाचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे नागरिकांना आवाहन

धाराशिव (जिमाका) पोलीस ठाणे बेंबळी येथे मिसींग क्रमांक ०२/२०२५ अंतर्गत एका वृद्ध इसमाच्या बेपत्ता होण्याची नोंद करण्यात आली असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

अर्जदार उमेश शेषेराव ढवळे (वय ६८ वर्षे),रा.बरमगाव (बु.), ता.जि. धाराशिव यांनी दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी पोलीस ठाणे बेंबळी येथे खबर दिली की,त्यांचे वडील शेषेराव तुलसीदास ढवळे (वय ६८ वर्षे), रा. बरमगाव (बु.) हे सहा-सात वर्षांपूर्वी धाराशिव येथे भजन-कीर्तनाच्या सप्ताहासाठी जात असल्याचे सांगून घरातून गेले होते. त्यानंतर ते अद्याप घरी परतले नाहीत.यापूर्वीही ते सहा-सहा महिने घरी येत नसल्याने कुटुंबीयांनी प्रतीक्षा केली;मात्र आता दीर्घकाळ लोटूनही ते न आल्याने बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली आहे.या प्रकरणी कोणावरही संशय किंवा तक्रार नसल्याचे अर्जदाराने नमूद केले आहे.

बेपत्ता इसमाचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे - नाव : शेषेराव तुलसीदास ढवळे (वय ६८ वर्षे),रंग सावळा, बांधा सडपातळ,उंची सुमारे १७० सेमी (नोंदीप्रमाणे), पेहराव पायजमा, नेहरू शर्ट,डोक्यावर टोपी,गळ्यात तुळशीची माळ व पायात चप्पल. भाषा मराठी असून थोडीफार इंग्रजी येते.

या इसमाबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास सहायक पोलीस निरीक्षक जी.व्ही.पाटील (मो. ८७७९४१६८२०) किंवा नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- बेंबळी पोलीस ठाणे पिकअप क्र एमएच २५ ए.जे. ०१२५ चा चालकाने दि.०६.०१.२०२६ रोजी पिकअप मध्ये गोवंशीय जातीचे तीन खोंड व एक गाय एकुण ६५,००० गोवंशीय जातीचे जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करत असताना बेंबळी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(डी), ११(१)(इ), ११(१)(के) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जिल्ह्यात जनजागृती टोलनाक्यांवर चालकांना मार्गदर्शन



धाराशिव,दि.०६ जानेवारी (जिमाका) रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते ०५ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाभर खालीलप्रमाणे विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

५ जानेवारी रोजी येडशी टोल नाका येथे जनजागृती कार्यक्रम : येडशी टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक श्री. सुनील शिंदे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.विशाल भगरे यांनी टोल नाका कर्मचारी,वाहतूक पोलीस कर्मचारी व वाहन चालकांना रस्ता सुरक्षेबाबत प्रबोधन केले.त्या ठिकाणी बॅनर प्रदर्शित करण्यात आले तसेच माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले.

तसेच मोटार वाहन निरीक्षक श्री. सुशांत धुमाळे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.सिद्धेश्वर मस्के यांनी वाहन चालकांना रस्त्यावर वाहन चालविताना मोबाईलचा वापर करू नये,दुचाकीधारकांनी हेल्मेट परिधान करावे,चारचाकी वाहनधारकांनी सीट बेल्टचा वापर करावा,अपघातग्रस्तांना मदत करावी तसेच मद्यपान करून वाहन चालवू नये,याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

पारगाव टोल नाका येथे माहिती पुस्तकांचे वाटप : पारगाव टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक श्री.सचिन बंग व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.शिवाजी बहीर यांनी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत वाहन चालकांना रस्ता सुरक्षा संबंधी माहिती पुस्तिकांचे वाटप केले.यावेळी मोबाईलचा वापर टाळणे, दुचाकीधारकांनी हेल्मेट वापरणे, चारचाकी वाहनधारकांनी सीट बेल्ट लावणे,अपघातग्रस्तांना मदत करणे व मद्यपान करून वाहन न चालवणे याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच तेथे बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रके वितरित करण्यात आली.

तलमोड टोल नाका येथे स्टिकर व बॅनरद्वारे जनजागृती : तलमोड टोल नाका येथे मोटार वाहन निरीक्षक श्री.उदयकुमार केंबळे,मोटार वाहन निरीक्षक श्री.विकास डोंगरे व सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री.कुलदीप पवार यांनी टोल नाका कर्मचाऱ्यांसोबत रस्ता सुरक्षेचे स्टिकर्स लावले.तसेच बॅनर प्रदर्शित करून माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले व वाहन चालक तसेच नागरिकांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## येरमाळा पत्रकार संघाच्यावतीने तानुबाई बिर्जे विशेष महिला पत्रकार पुरस्काराने शिलाताई उंबरे यांचा दर्पण दिनी सन्मान



येरमाळा (प्रतिनिधी)-दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती तथा पत्रकार दिनानिमित्त येरमाळा पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा तानुबाई बिर्जे विशेष महिला पत्रकार पुरस्काराने धाराशिव येथील तीस वर्षे पत्रकारीता केलेल्या शिलाताई उंबरे यांचा सन्मान सोहळा सकाळी ११ वाजता येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित येरमाळा पत्रकार अभ्यासिका कार्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित येरमाळा पत्रकार वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त येथील शाळेमध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धे चे बक्षीस वितरण, आशा कार्यकर्ती व अंगणवाडी सेविका आणि मदतनीस सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी रत्नदीप बारकुल निरीक्षक वैद्यमापन शास्त्र (राजपत्रित), वैभव कवडे राज्यकर निरीक्षक अधिकारी,जयदेवी कांबळे पुरवठा निरीक्षक तहसील कार्यालय कळंब, महिला ज्येष्ठ पत्रकार शीला उंबरे,माजी सभापती विकास बारकुल यांची प्रमुख उपस्थिती होती.आज दि ६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त येरमाळा पत्रकार संघाच्या वतीने विशेष पुरस्काराचे वितरण करण्यात आले असून धाराशिव जिल्ह्यातील महिला पत्रकारिता क्षेत्रातील श्रीमती शीला उंबरे यांना तानुबाई बिर्जे महिला पत्रकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले असून यापुढेही मराठवाड्यासह राजातील महिला पत्रकारांना तानुबाई बिर्जे पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे तसेच येरमाळा पत्रकार बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचालित येरमाळा पत्रकार अभ्यासिका इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आले असून पुढील काही दिवसां विविध स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासिका उपलब्ध होणार आहे या कार्यक्रमासाठी सरपंच सौ.प्रिया बारकुल,वैद्यकीय अधिकारी डॉ.सुधाकर बिराजदार,सहायक पोलीस निरीक्षक तात्याराव भालेराव डॉ.पल्लवी तांबारे (संचालक येडाई व्यसनमुक्ती फाउंडेशन), सचिन पाटील (संस्थापक विद्यानिकेतन विद्यालय येरमाळा), प्राचार्य सुनील पाटील ( ज्ञानोद्योग विद्यालय येरमाळा),सतोष तौर,पापा पायाळे, यांच्यासह विद्यार्थी,शिक्षक,पत्रकार,आशा कार्यकर्ती व अंगणवाडी सेविका आणि मदतनीस, ग्रामस्थ उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्ता बारकुल,सूत्रसंचलन प्रा.महादेव गपाट यांनी तर आभार सचिन बारकुल यांनी मानले.

### सोन्याच्या दागिण्याची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राधा रामचंद्र कोळी, वय ५५ वर्षे, रा. सांजा रोड भवानी चौकएस टी कॉलनी धाराशिव ता. जि.धाराशिव हे ०३.०१.२०२६ रोजी खंडोबा देवाचे दर्शन घेवून यात्रेत मंदीर परिसरात अज्ञात व्यक्तीने राधा कोळी यांचे १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकुण ३८,२०० किंमतीचे गर्दीचा फयदा घेवून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी राधा कोळी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हा माहिती कार्यालय येथे बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



धाराशिव (जिमाका)- दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण ची सुरुवात केली.६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.या दिवसानिमित्त आज जिल्हा माहिती कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन करण्यात आले.जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.

यावेळी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, संपादक विभीषण लोकरे,राजू गंगावणे, पत्रकार प्रवीण पवार,जिल्हा माहिती कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक नंदू पवार व आशा बंडगर,वाहन चालक मोहन कोळी कनिष्ठ लिपिक दिलीप वाठोरे,चित्रा घोडके व अनील वाघमारे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.उपस्थितांनी सुद्धा प्रतिमेचे पूजन करून पुष्प अर्पण केली.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## विकासाबाबत चर्चा कमीच..

राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुक प्रक्रिया चालू असून येत्या पंधरातारखेला मतदान आहे. जशी-जशी मतदानाची तारीख जवळ येत आहे तसे अनेक मुद्दे चर्चेला येत आहेत. यावेळी विकासकामाबाबत चर्चा कमीच दिसून येत असून बाकीच्या नको त्या चर्चेत राहाणारे मुद्दे उकरून काढून चर्चेला उधाण आणण्याचा जो केविलवाणी सर्वपक्षांचा प्रयत्न आहे तो लोकशाहीसाठी दुर्दैवी आहे. लोकशाहीत जनतेच्या समस्यावर चर्चा अपेक्षित असते. जनतेच्या ज्या काही मुलभूत गरजा आहेत त्या कशा व कोणत्या पद्धतीने निरसण करणार याचा वचननामा देण्याची ही वेळ आहे. कोणी वचननामा देते तर कोणी इतरच गप्पा मारताना दिसून येत आहे. एकतर राज्यात भाजपाविरोधी काँग्रेस अशी सरळ लढत आहे. इतर ठिकाणी सेना विरुद्ध सेना आहे. मुंबईत मनसे विरोधात भाजपा आहे. असे जरी असले तरी विकास कसा करणार? यावर चर्चा अपेक्षित आहे. मुळात लोकशाही स्विकारून किती वर्ष झाली तरी त्याच-त्या समस्या वार्डात आहेत किंबहून देशात आहेत. मुलभूत गरजा संपल्या पाहिजे. दरपाच वर्षाला त्याच समस्या दिसून येत आहेत. त्या सोडविण्याचे आश्वासन नेत्याकडून दिले जाते. निवडूण आलेले मात्र साडेचारवर्ष मजेत दिसतात. नगरपालिका किंवा महानगरपालिकेत कर्मचारी तेच कायम दिसतात तर दरपाच वर्षांनी निवडूण येणारे नवे नगरसेवक दिसतात हा फरक दिसतो. वास्तविक आता पर्यंत किमान सत्तरटक्के तरी मुलभूत गरजाची पुर्तता होणे अपेक्षित आहे. नवीन वसाहात आहे. नवीन भाग शहराला जोडला आहे. अशा भागात मुलभूत गरजाची पुर्तता करावी लागते ही वस्तूस्थिती आहे. असे असले तरी प्रत्यक्षात तर पाच वर्षांनी तेच प्रश्न असल्याने, या बाबत कंठाळलेल्या नागरिकांना सुद्धा नवीन उकरून काढलेले प्रश्न चवीने चर्चेली जात असेल तर लोकशाहीने तरी काय करावे? मुळात आपल्या भागातील आपल्या समस्या सोडविणारा नगरसेवकांची निवड होणे अपेक्षित आहे. असे काही ठिकाणी होते तर काही ठिकाणी होत नाही. त्यामुळे समस्या ह्या कायम दिसून येतात. सर्वांत जिव्हाळ्याची नागरिकांसाठी समस्या ही पिण्याच्या पाण्याची आहे. रस्ते, गटारी, खांबावरील वीजेची समस्या ह्या सोडविणे फार कठिण नाहीत. एकदा का दर्जेदार झाल्या की, पुन्हा या समस्या निर्माण होत नाहीत. केवळ देखभाल करावी लागते. ही कामे प्रशासन करू शकते. प्रत्यक्षात नगरसेवकांचे ते काम नाही. कामे करून घेणे ह्याकडेच नगरसेवकांचे काम आहेत. तरी दर पाच वर्षांनी त्याच समस्या दिसून येतात. यावेळीतर त्या समस्याची ओरड कमी दिसून येते. नको ते प्रश्न उद्भवलेले जात आहेत. वास्तविक उमेदवार हा जनतेतून उभा राहातात उभे केले जात नाहीत. उमेदवारी पक्षाकडून दिली जाते जनतेतून नाही ही प्रक्रिया लोकशाहीला किती धरून आहे हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे जनतेनी आता तरी सावध होवून चालले पाहिजे. काही भागात दर्जेदार कामे होतात. रस्ते चकाचक दिसून येतात. लातूरातील काही भागच दुर्लक्षित दिसून येतो. काही भागातील आमचा अनुभव असा आहे की, एकदा प्रभागातून निवडूण गेला तो परत दिसून येत नाही. त्यांचे पती 'बाद में आयो' म्हणून हाकलून देतानाचा अनुभव आहे. मुळात सामाजिक कामाची तळमळ असणारा उमेदवारांची संख्या कमी दिसून येते. धनी व सर्वसंपन्न असलेले उमेदवारांची संख्या अधिक दिसून येते. त्यामुळे ज्यांना सामाजिक कामाचा गंध नाही. अशांना उमेदवारी देणे किंवा नागरिकांनी ती स्विकारणे किती प्रमाणात योग्य आहे याचा विचार केला पाहिजे. नागरिकांची निवड कधी तरी चुकीचे ठरू शकते, ती ठरू नये यासाठी जागरूक होऊन मतदान करणे आवश्यक आहे. उमेदवारांना समस्याची जाण असणे आवश्यक आहे. असे जरी वाटत असले तरी सध्याला काय चालू आहे हे पाहून सर्व काही निरर्थक आहे हे कळून येते. तसा विचार केला तर दरवर्षी किंवा दर पाच वर्षाला तीच कामे आहेत. तोच रस्ता खोदणे, गटारी खोदणे पुन्हा बांधणे व जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणे हा कार्यक्रम कोठे तरी थांबविला पाहिजे. जनताच ती थांबवु शकते. अशा मुलभूत गरजा बाबत चर्चा अपेक्षित आहे, ती होताना दिसून येत नाही. गरजा तशा नगरात अति असतात असे नाही. तरी नागरिकांच्या समस्याकडे लक्ष देणारा नगरसेवक असावा. आता प्रशासन कामे करीत आहेत. स्वच्छतेचे कंत्राट दिले आहे. आता तसे पाहिले तर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची कामे कंत्राटदारच करीत आहेत. कचऱ्याचे, विद्युत आदि कामाचे कंत्राट दिले आहे. केवळ जनतेकडून भरमसाठ वसुली करावयाची त्या बदल्यात प्रामाणिक कामे होत नाहीत हे दुर्दैव दिसून येते. मुळात आपल्या नगरात समस्याचे माहेरघर नाही तरी लोकशाहीनुसार पाच वर्षांनी नगरसेवक निवडूण देतो. त्यांना कधी जाब विचारतो का? मुळात जाब विचारण्यासाठी ते सापडतात कोठे? त्यामुळे सध्याला मुलभूत गरजा पुर्तते बाबत कोणी बोलत नाही. काही तरी मुद्दे उकरून काढावयाचे किंवा बोलताना जीभ घसरली की, त्याचे भांडवल करावयाचे हाच प्रकार दिसून येत आहे. याला जनतेनी रोखले पाहिजे. पहिल्यांदा नागरिकांनी योग्य सामाजिक जाण असलेला उमेदवार उभा केला पाहिजे, त्यालाच निवडूण दिले पाहिजे. सध्याला कोणीही उभा राहाते. त्याच्या मागे कामाची पाटी कोरी असते. सामाजिक कामाचा अनुभव नसतो. समस्या सोडविण्याचा गंध नसतो तरी तो उभा राहतो तो निवडूण येतो ही या प्रक्रियेला काय म्हणावे? यावेळी मात्र मुलभुत गरजा बाबत कोणी बोलत नाहीत. त्या कशा प्रकारे सोडविणार हे सांगत नाहीत. कोणीही या प्रभागात ही समस्या आहे ती अशा प्रकारे सोडविणार हे अजूनतरी सांगितले नाही. उमेदवारीसाठी मारामारी दिसून आली. नेत्याची कॅबीन फोडण्याचे काम दिसून आले. बंडखोरी मोठ्या प्रमाणात दिसून येते. हा प्रकार नगराच्या सेवकांचा शोभणारा आहे का? या बाबत चिंतन झाले पाहिजे. काही झाले तरी सेवक या शब्दाचा अर्थ जाणून घेवुन चालले पाहिजे. निश्चित अशांना जनता स्विकारेल, जनता उभा करेल व बिनविरोध निवडूण देईल यात शंका घेण्याचे कारण नाही. यावेळी चर्चा ही विनाकारणाची दिसून येते याचा विचार मतदार किती करतील हे पाहाणे बाकी आहे.

# दौंड-काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाच्या कामामुळे सोलापूर विभागातील स्थानकांमधून धावणाऱ्या गाड्यांवर होणारे परिणाम

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वे, दौंड-मनमाड विभागातील दौंड-काष्टी स्थानकांदरम्यान दुहेरीकरणाचे काम सुरू करण्यासाठी वाहतूक ब्लॉक घेणार आहे. ब्लॉकमुळे सोलापूर विभागातील स्थानकांमार्गे धावणाऱ्या गाड्यांच्या वाहतुकीवर होणारे परिणाम खालीलप्रमाणे आहेत:

**रद्द केलेल्या गाड्या खालील गाड्या रद्द राहतील:**

**गाडी क्रमांक**
०१४६१ सोलापूर-दौंड डेमू स्पेशल, दिनांक ०४.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत

**गाडी क्रमांक**
०१४६२ दौंड-सोलापूर डेमू स्पेशल, दिनांक ०४.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत

**गाडी क्रमांक**
१२१६९ पुणे-सोलापूर इंटरसिटी एक्सप्रेस, दिनांक १५.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत

**गाडी क्रमांक**
१२१७० सोलापूर-पुणे इंटरसिटी एक्सप्रेस, दिनांक १५.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ पर्यंत

**गाडी क्रमांक**
१२१५७ पुणे-सोलापूर हुतात्मा एक्सप्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
१२१५८ सोलापूर-पुणे हुतात्मा एक्सप्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
११४१७ पुणे-सोलापूर एक्सप्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
११४१८ सोलापूर-पुणे एक्सप्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
०१४८७ पुणे-हरंगुळ स्पेशल, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
०१४८८ हरंगुळ-पुणे स्पेशल, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

गाडी क्रमांक
११४२१ हडपसर-सोलापूर डेमू, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
११४२२ सोलापूर-हडपसर डेमू, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
१७६१३ पनवेल-नांदेड एक्स्प्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
१७६१४ नांदेड-पनवेल एक्स्प्रेस, दिनांक २४.०१.२०२६ आणि २५.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
०१४२२ कलबुरगि-दौंड स्पेशल, दिनांक २४.०१.२०२६

**गाडी क्रमांक**
०१४२५ दौंड-कलबुरगि स्पेशल २५.०१.२०२६ रोजी

**गाडी क्रमांक**
११४१३ निजामाबाद-पंढरपूर एक्स्प्रेस, २५.०१.२०२६ रोजी

**गाडी क्रमांक**
११४१४ पंढरपूर-निजामाबाद एक्स्प्रेस, २६.०१.२०२६ रोजी

वळविण्यात आलेल्या गाड्या
नमूद केल्याप्रमाणे पुढील गाड्या पर्यायी मार्गे वळविल्या जातील:

**गाडी क्रमांक**
१६३३२ तिरुवनंतपुरम-सीएसएमटी मुंबई एक्स्प्रेस, दिनांक २४.०१.२०२६, कुर्डुवाडी-मिरज-पुणे मार्गे वळवली जाईल

**गाडी क्रमांक**
११३०२ केएसआर बेंगळुरू-सीएसएमटी मुंबई उद्यान एक्स्प्रेस, दिनांक २४.०१.२०२६, कुर्डुवाडी-मिरज-पुणे मार्गे वळवण्यात येईल

**गाडी क्रमांक**
२०६५७ हुबळी-हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस, दिनांक २३.०१.२०२६, सोलापूर-कुर्डुवाडी-लातूर-परळी वैजनाथ-परभणी-छत्रपती संभाजीनगर-मनमाड मार्गे वळवण्यात येईल

रीशेड्यूल
नमूद केल्याप्रमाणे खालील गाड्यांचे **वेळापत्रक पुनर्निर्धारित केले जाईल:**

**गाडी क्रमांक**
१८५२० एलटीटी मुंबई-विशाखापट्टणम एक्स्प्रेस, जेसीओ १५.०१.२०२६ ते २४.०१.२०२६, आणि २५.०१.२०२६ रोजीच्या गाड्या अनुक्रमे २ तास आणि ४ तास ३० मिनिटांनी पुनर्निर्धारित केल्या जातील

**गाडी क्रमांक**
११३०१ सीएसएमटी मुंबई-केएसआर बेंगळुरू उद्यान एक्सप्रेस, १५.०१.२०२६ ते २५.०१.२०२६ दरम्यानची यात्रा १ तासाने पुनर्निर्धारित केली जाईल

**गाडी क्रमांक**
२२८८१ पुणे-भुवनेश्वर सुपरफास्ट एक्सप्रेस, १५.०१.२०२६ रोजीची यात्रा १ तास ३० मिनिटांनी पुनर्निर्धारित केली जाईल

**गाडी क्रमांक**
२२६०२ साईनगर शिर्डी-चेन्नई सेंट्रल साप्ताहिक एक्सप्रेस, १६.०१.२०२६ आणि २३.०१.२०२६ रोजीची यात्रा अनुक्रमे २ तास आणि ३ तासांनी पुनर्निर्धारित केली जाईल

**गाडी क्रमांक**
२२६८९ अहमदाबाद-यशवंतपूर एक्स्प्रेस, २०.०१.२०२६ रोजीची यात्रा ३ तासांनी पुनर्निर्धारित केली जाईल

**गाडी क्रमांक**
१८५२० एलटीटी मुंबई-विशाखापट्टणम एक्स्प्रेस, २५.०१.२०२६ रोजीची यात्रा ४ तास ३० मिनिटांनी पुनर्निर्धारित केली जाईल

**गाडी क्रमांक**
१७०१३ हडपसर-काझीपेठ एक्स्प्रेस, २५.०१.२०२६ रोजीची यात्रा १ तासाने पुनर्निर्धारित केली जाईल

**नियंत्रण**

**गाडी क्रमांक**
१२६२८ नवी दिल्ली-केएसआर बेंगळुरू कर्नाटक एक्स्प्रेस, २३.०१.२०२६ रोजीची यात्रा १ तास ४० मिनिटांनी नियंत्रित केली जाईल.

भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी ही पायाभूत सुविधांच्या सुधारणेची कामे महत्त्वपूर्ण आहेत. प्रवाशांना सहकार्य करण्याचे आणि होणाऱ्या परिणामांची नोंद घेऊन त्यानुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# दयानंद गेट येथे PSI वयोमर्यादा वाढीच्या मागणीसाठी आंदोलन; NSUI चा जाहीर पाठिंबा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर : पोलीस उपनिरीक्षक (PSI) भरती परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढवण्यात यावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला लातूर शहरातील दयानंद गेट येथे एन.एस.यू.आय. (NSUI) ने जाहीर पाठिंबा दिला. या आंदोलनात मोठ्या संख्येने परीक्षार्थी विद्यार्थी सहभागी झाले असून, आपल्या हक्कांसाठी त्यांनी ठाम भूमिका घेत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. PSI भरतीची जाहिरात उशिरा प्रसिद्ध झाल्याने तसेच वारंवार परीक्षांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे अनेक उमेदवार वयोमर्यादेच्या अडचणीत सापडले आहेत. यामुळे पात्र असूनही संधीपासून वंचित राहण्याची भीती विद्यार्थ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वयोमर्यादा किमान दोन वर्षांनी वाढवावी, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. दयानंद गेट परिसरात झालेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी घोषणा देत शासनाच्या भरती प्रक्रियेतील दिरंगाईवर नाराजी व्यक्त केली. NSUI च्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. PSI परीक्षेसाठी मेहनत घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. लातूरसह राज्यभरात या मागणीला वाढता पाठिंबा मिळत असून, येत्या काळात आंदोलनाची व्याप्ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा फूलेंच्या वैचारिक क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य : डॉ. नागोराव कुंभार

## माझं घर मध्ये महात्मा फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण

**लातूर/प्रतिनिधी :** स्त्री-पुरुष समानता, शिक्षण आणि जातीव्यवस्थेविरुद्ध शेवटच्या श्वासापर्यंत महात्मा जोतीराव फूले यांनी संघर्ष केला. समाजात समताधिष्ठित मूल्ये रुजावी, यासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य समाजासाठी अभिमानास्पद, प्रेरणादायी आहे. महात्मा फूलेंच्या वैचारिक क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत डॉ.नागारोव कुंभार यांनी केले.

बुधोडा ता. औसा येथील माझं घर प्रकल्पात महात्मा जोतिराव फूले यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ कुंभार प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते. याप्रसंगी लेखिका अरूणा दिवेगावकर, प्रमोद झिंझाडे, राजेंद्र कासार, हरिश्चंद्र सूडे, ड. शोभाताई गोमारे, डॉ. निलम पन्हाळे,माया सोरटे, रंजना चव्हाण,रंजना हासूरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बोलताना डॉ. नागारोव कुंभार म्हणाले की, महात्मा फुले यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना समान संधी मिळवून देण्याबरोबरच ब्राह्मणवादी वर्चस्वाला आव्हान देण्याचे कार्य केले. ज्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मिळाली. समतेच्या लढ्यात शिक्षण हेच सामाजिक बदलाचे प्रमुख साधन मानून त्यांनी मुलींसाठी आणि बहुजन समाजासाठी भारतातली पहिली शाळा सुरू केली. सर्वांना समान ज्ञान यापध्दतीने शिक्षणाची व्यवस्था उभी केली. जातीभेदावर आधारित विषमतेला जोरदार विरोध केला. ब्राह्मण्यवादी वर्चस्वाला आव्हान दिले. स्त्रिया शिक्षीत झाल्या तरच समाज प्रगती करेल यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी विधवा पुनर्विवाह व बालविवाहासारख्या प्रथांविरुद्ध आवाज उठवला. आज विविध क्षेत्रात



महिलांची होणारी प्रगती महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याच्या कामाची पावती आहे. वैचारिक क्रांती खर्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडवू शकते यावर त्यांची धारणा होती.

स्त्री-मुक्तीच्या चळवळीचा पाया महात्मा फूले यांनी घातला. सामाजिक प्रबोधनाचे, परिवर्तनाचे पहिले पाऊल त्यांनी घट्ट रोवले. स्त्री ही पारंपरिक रुढीच्या दास्यातून खऱ्या अर्थान मुक्त व्हायची असेल तर तिला शिक्षण दिले पाहिजे याचा आग्रह त्यांनी धरला. हिंदूंच्या धर्मग्रंथात सांगितलेला सिद्धांताचा फोलपणा दाखवून देत ब्राह्मणी व्यवस्थेच्या वर्चस्वाच्या मूलाधारालाच त्यांनी धक्का देण्याचे काम केले. महात्मा फुले हे एक प्रचंड असे समाज परिवर्तनाचे, समाज सुधारणेचे, धगधगत्या पण वास्तववादावर उभे असलेल्या सामाजिक विचारांचे पहिले भारतीय समाज विद्यापीठ होते असेही डॉ. कुंभार म्हणाले.

अरुणा दिवेगावकर यांनी अंधश्रद्धा, मानव मुक्ती, स्त्रीमुक्ती यावर आपले मनोगत व्यक्त केले. रंजना हासूरे यांचेही भाषण झाले. कार्यक्रमास समाजवादी नेते शिवाजीराव शिंदे, प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्रा. सुभाष भिंगे, बसव विचारवंत सुनिल हेंगणे, डॉ. गणेश गोमारे, प्रा.रितापूरे , प्रा.आर डी निटुरकर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यकर्माचे सूत्रसंचलन सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालासाहेब यादव यांनी केले. पांडुरंग मोरे यांनी आभार मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता झरे, दगडूसाहेब पडिले, सतिष सोनकांबळे, पांडूरंग जाधव, सुनिल हेंगणे, रफिक पटेल, कपिल शेवाळे,निंबराज बिरादार, बस्वराज अष्टपुत्रे, संतोष साखरे आदींनी परिश्रम घेतले.

# थंडीत करा अस्सल गावरान चवीचा चमचमीत पावटा भात

सध्याच्या गुलाबी थंडीत गरमागरम आणि चविष्ट पावटा भात खाण्याची मजाच काही वेगळी. बाजारात पावट्याच्या शेंगा बऱ्याच दिसून येतात. ताज्या पावट्यांचा वापर करून तुम्ही चमचमीत पावटा भात बनवू शकता. ज्याची रेसिपी एकदम सोपी आहे. पावटा भात करण्याची सोपी, साधी रेसिपी पाहूया. थंडीच्या दिवसांत तुम्ही ही रेसिपी ट्राय केली तर जिभेलाही चव येईल.

**पावटा भात करण्याची सोपी पद्धत**

हा पदार्थ केवळ चविष्ट नसून पौष्टिकही आहे. पावटा भात करवण्यासाठी सगळ्यात आधी तांदूळ धवून बाजूला ठेवा. नंतर एका मोठ्या पातेल्यात किंवा कुकरमध्ये तेल गरम करून त्यात मोहोरी, जीरं, कढीपत्ता, हिंग, हळदीची फोडणी तयार करा. या फोडणीत बारीक चिरलेला कांदा, आलं-लसूण पेस्ट आणि हिरव्या मिरच्या परतवून घ्या. कांदा गुलाबी झाला की त्यात ताजे सोललेले पावट्याचे दाणे, चिरलेला बटाटा आणि आवडीनुसार फ्लॉवरचे तुकडे घालून वाफेवर थोडं शिजवून घ्या. फोडणीचा सुगंध सुटला की त्यात कोल्हापुरी कांदा लसूण मसाला किंवा गोडा मसाला, लाल तिखट आणि गरम मसाला मिसळून घ्या. मसाल्याचा कच्चेपणा गेल्यावर त्यात धुतलेले तांदूळ घालून व्यवस्थित परतवून घ्या.

जेणेकरून मसाला प्रत्येक तांदळाच्या कणाला लागेल. आता यात तांदळाच्या दुप्पट गरम पाणी, चवीनुसार मीठ घाला. वरून ओलं खोबरं आणि भरपूर बारीक चिरलेली कोथिंबीर घालून कुकरच्या दोन शिट्ट्या करून घ्या किंवा पातेल्यावर झाकण ठेवून मंद आचेवर भात शिजवून घ्या.

भात शिजत असताना येणारा पावट्याचा आणि मसाल्याचा सुवास संपूर्ण घरात दरवळतो. तयार मऊ पावटा भातासोबत तुम्ही लिंबाची फोड आणि ओल्या खोबर्याची चटणी किंव ताक सर्व्ह करू शकता. हिवाळ्यातील रात्रीच्या जेवणासाठी हा एक उत्तम वन पॉट मील आहे.

# मटारचा मौसम आणि खाण्याची चंगळ! मुलांच्या शाळेच्या डब्यासाठी करा मटार-पनीर सँडविच



हिवाळ्यात हिरव्यागार मटारच्या शेंगा पाहिल्या की त्या घेऊन खाण्याचा मोह होतोच. मटारचा टपोरा दाणा नुसता तसाच खायला तर छान लागतोच पण त्यासोबतच आपण त्याच्या कित्येक वेगवेगळ्या रेसिपीही करू शकतो. अशीच एक रेसिपी म्हणजे मटार पनीर सॅण्डविच. तसंही सॅण्डविच लहान मुलांसकट मोठ्या माणसांनाही मनापासून आवडतं. त्यात आपण मटार आणि पनीर हे दोन भरपूर प्रोटीन्स देणारे पदार्थ घालणार आहोत. त्यामुळे तर हे मटार पनीर सॅण्डविच खूप पौष्टिकही होतं. त्यामुळे या रेसिपीचा विचार तुम्ही मुलांच्या डब्यासाठी तसेच नाश्त्यासाठी नक्कीच करू शकता. मटार पनीरची ही खास रेसिपी सेलिब्रिटी शेफ कुणाल कपूर यांनी शेअर केली आहे.

**साहित्य**

ब्रेड स्लाईस
१ वाटी मटार आणि तेवढेच किसलेले पनीर
बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या आणि कोथिंबीर
पुदिना चटणी आणि टोमॅटो सॉस चवीनुसार
धनेपूड, चाट मसाला, गरम मसाला, चवीनुसार मीठ आणि कसूरी मेथी
१ टेबलस्पून बटर आणि बारीक चिरलेला कांदा

**कृती**

मटार पनीर सॅण्डविच करण्यासाठी एक कढई गॅसवर ठेवून गरम करून घ्या. त्यानंतर तिच्यामध्ये बटर घाला आणि थोडंसं मीठ घालून मटार हलकेसे परतून घ्या.

यानंतर मऊ झालेले मटार मॅश करून घ्या. त्यामध्ये किसलेलं पनीर, कोथिंबीर, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या आणि कांदा, धणेपूड, चाट मसाला, कसूरी मेथी, गरम मसाला, चवीनुसार मीठ घालून सगळे पदार्थ व्यवस्थित एकजीव करून घ्या.

यानंतर २ ब्रेड स्लाईस घ्या. एका स्लाईसला पुदिना चटणी आणि दुसऱ्या स्लाईसला टोमॅटो केचअप लावा. यानंतर तयार केलेलं बॅटर दोन ब्रेडच्यामध्ये ठेवून ते बटर लावून ग्रील करून घ्या. किंवा तव्यावर ठेवून दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. गरमागरम, चटपटीत मटार सॅण्डविच तयार..

# पनीरची अशी भाजी कधीच खाल्ली नसेल!

'पनीरची भाजी' म्हटली की आपल्याला पनीर टिक्का किंवा पनीर बटर मसाला अशा पनीरच्या वेगवेगळ्या भाज्या डोळ्यांसमोर येतात. पण जर आपल्याला हॉटेल किंवा ढाब्यावर मिळते तशी काहीतरी हटके आणि चविष्ट रेसिपी घरी तयार करायची असेल, तर 'पनीर खिमा मसाला' हा एक उत्तम पर्याय आहे. पनीर हा शाकाहारी जेवणातील सर्वांचाच आवडता पदार्थ... पण नेहमीच्याच पनीरच्या त्याच त्या भाज्या खाऊन कंटाळा आला असेल तर 'पनीर खिमा मसाला' ही डिश नक्की ट्राय करून पाहा... मऊ लुसलुशीत पनीर, कांदा-टोमॅटोची ग्रेव्ही आणि वरून बटरचा तडका... हा बेत कोणाला आवडणार नाही..

घरच्यांच्या खास फर्माईशसाठी, ही रेसिपी तुमच्या जेवणाची रंगत नक्कीच वाढवेल. घरात उपलब्ध असलेल्या साध्या मसाल्यांपासून तयार होणारा हा पदार्थ चवीला मात्र अतिशय शाही लागतो. हॉटेल किंवा ढाब्यावर मिळते तशीच परफेक्ट चवीची, उत्तम ग्रेव्ही आणि टेक्श्चर असणारी ही खास पनीरची चविष्ट डिश तयार करण्याची सोपी रेसिपी पाहूयात...

**साहित्य :-**

१) आलं - १/२ टेबलस्पून (किसलेल आलं) २) लसूण - ४ ते ६ पाकळ्या ३) हिरव्या मिरच्या - ३ ते ४ (बारीक चिरलेल्या) ४) कोथिंबीर - २ टेबलस्पून (बारीक चिरलेली) ५) पनीर - १ कप (बारीक तुकडे केलेले) ६) तेल - १ टेबलस्पून ७) बटर - १ टेबलस्पून ८) खडे मसाले - १ टेबलस्पून (लवंग, दालचिनी, तमालपत्र, चक्रीफूल) ९) कांदा - १ कप १०) टोमॅटो - १ कप ११) मीठ - चवीनुसार १२) बेसन - १/२ टेबलस्पून १३) लाल तिखट मसाला - १/२ टेबलस्पून १४) धणेपूड - १/२ टेबलस्पून १५) कसुरी मेथी - १/२ टेबलस्पून १६) जिरेपूड - १/२ टेबलस्पून १७) साजूक तूप - १ टेबलस्पून ( हलकं गरम केलेलं) १८) लिंबाचा रस - १ टेबलस्पून.

# मधुमेद आणि झोप नेमका संबंध काय?

सध्या जगभरात भारताला मधुमेदाची राजधानी म्हटले जाते एवढी आपल्याकडील मधुमेद असणाऱ्यांची संख्या वेगात वाढते आहे. त्यातील अनेकांना 'टाइप टू' या स्वरूपाचा मधुमेद आहे.

डॉ. नितीन पाटणकर

माझ्या बालपणी रक्त तपासणाऱ्या लॅब्ज खूपच कमी होत्या, गावाकडे तर नव्हत्याच. त्यामुळे अनेक जण रक्ततपासणीसाठी मुंबईत यायचे, कुणा नातेवाईकांकडे वस्तीला राहायचे. सकाळी रक्त तपासणीला देऊन मग गावाला जायचे. रिपोर्ट आले की ते पोस्टाने गाव पाठवले जायचे. ते रिपोर्ट पाहून गावातील डॉक्टर इलाज करायचे. तेव्हा रोगसुद्धा बहुतेक संथ असावेत, कारण रक्ताच्या आठवड्यापूर्वीच्या रिपोर्टवर डॉक्टर औषध द्यायचे. असे असूनदेखील रोगही बरा व्हायचा किंवा मधुमेद नियंत्रणात तरी



राहायचा. अशाच एका पाहुण्याच्या साखरेचा रिपोर्ट आणायला लॅबमध्ये पिटाळण्यात आले होते. हे पाहुणे आमच्या घरी बसल्या बसल्या झोपत होते. ते पाहून मला खूप मजा येत होती. रात्री भयंकर घोरायचे आणि दिवसा झोपायचे तेही बोलता बोलता. मी त्यांचा रिपोर्ट आणायला लॅबमध्ये गेलो. मी रिपोर्ट घेतला आणि बालसुलभ आगाऊपणे डॉक्टरांना विचारले, 'कसे आहेत रिपोर्ट?'ङ्गतू औषध देणार आहेस?फ डॉक्टर. नाही, आई विचारेल, डॉक्टरना विचारायचेस तरी, म्हणून विचारतोय,फ मी.

मग डॉक्टरांनी रिपोर्ट बघितले, बहुतेक साखर खूप जास्त असावी. ते एकदम ताठ झाले आणि म्हणाले, ङ्गअरे पेशंट आहे की साखरेची गोण? इतके दिवस काय झोपा काढतोय काय हा?फ या प्रश्नाला मी मोठ्याने ङ्गहो सारखा झोपत असतोफ असे सांगितले. आता यात काय चुकले कुणास ठाऊक, डॉक्टरांनी हातात रिपोर्ट कोंबले आणि लॅबच्या बाहेर काढले. तेव्हापासून झोप आणि मधुमेद यांचा काही तरी संबंध असतो हे लक्षात होते.

आणखी वाचा– उन्हाळ्यात स्त्रियांना अधिक गरम का होते?

जायफळ घालून श्रीखंड खाल्ल्यावर जसे अंगावर येते, गुंगी येते तसे; मधुमेद असेल तर जरा कुठे जास्त खाणे झाले की अंगावर येते, झोप येते. झोपेत मात्र बरेचदा विचित्र स्वप्ने पडतात, रात्री घाईची लघवीला जाण्याची भावना होऊन, झोपमोड होत राहते. रात्रीच्या जागरणांची सवय लागली तर, उत्तररात्री आणि दुसऱ्या दिवशी गोड आणि तळलेल्या पदार्थांवरील वासना वाढते, त्यातून स्थूलता आणि मधुमेद होण्याची शक्यतादेखील वाढते. अमेरिकेमधील २३ शहरांमध्ये मिळून एक सर्व्हे केला, ज्यात तीन हजारांपेक्षा जास्त लोकांचा अंतर्भाव होता. या चाचणीचा अहवाल, ङ्गअसोसिएटेड प्रोफेशनल स्लीप सोसायटीफ या संस्थेने प्रसिद्ध केला, ज्यात नमूद करण्यात आले आहे की जंक फूड खायला मिळाले नाही तर जे अस्वस्थ होतात, (क्रेव्हिंग असते जंक फूडचे ) त्यांच्यामध्ये झोप न घेतल्यास मधुमेद होण्याचे प्रमाण खूप जास्त असते.ङ्गबीएम.सी. पब्लिक हेल्थफ या मासिकात प्रसिद्ध झालेल्या एका कोरियन चाचणीत, एक लाखांहून जास्त लोकांची निरीक्षणे नोंदवली गेली, त्यांच्यामध्ये एक मजेशीर बाब पुढे आली आहे. सहा तासांपेक्षा कमी झोपणाऱ्या लोकांमध्ये मधुमेदाचे प्रमाण वाढतेच, पण दहा तासांपेक्षा जास्त झोपणाऱ्यांमध्येही मधुमेदाचं प्रमाण तितकेच वाढलेले दिसते. भारतात ज्या लोकांना मधुमेद असतो, त्यात बहुतेकांना ङ्गटाइप टूफ या स्वरूपाचा मधुमेद असतो. ज्यामधे ङ्गइन्सुलिन रेसिस्टन्सफ म्हणजे इन्सुलिन जास्त पाझरूनदेखील त्याचा प्रभाव कमी असतो. हे घडण्यामागे अनेक कारणे असतात, त्यातील एक कारण, ङ्गरात्री झोपताना, दिवा सुरूच ठेवून झोपणेफ हे असते.मधुमेद आणि घोरणे यांचा संबंध तर वेगळाच. या घोरण्यात पण दोन मुख्य घराणी आहेत.

# शिक्षणाचा मूलभूत अर्थच हरवत चालला

जीवनाच्या उन्नतीकरिता माणसे जीवनभर विविध प्रयत्न करत असतात; मात्र ही उन्नती कोणती? हा प्रश्न अनेकदा कायम असतो. जीवनात आपल्याला सुख, समाधान, आनंद, प्रतिष्ठा, सन्मान, आदर हवा असतो. या कल्पनादेखील सापेक्ष असतात. या वाटा आपल्या आयुष्यात याव्यात याकरिता माणसे हवे ते करण्याचा प्रयत्न करतात; मात्र सारे मिळाले तरी माणसे समाधानी होत नाहीत. माणसाला जीवनाचा अर्थ शोधता यावा, त्याला आपल्या जीवनाचे मोल लक्षात यावे, जीवन म्हणजे नेमके काय? जीवनाला असलेला सखोल अर्थ अधिक गंभीरपणे जाणता यावा, याकरिता शिक्षण संस्थांची निर्मिती समाजातील कर्त्या लोकांनी केली आहे. शिक्षणाचा ज्ञानप्रकाश जीवनात आला की, अज्ञानांचा अंधार आपोआप संपुष्टात नष्ट होतो.

माणसांच्या जीवनात शिक्षणाने विचार पेरण्याची आवश्यकता आहे. वर्तमानात शिक्षणाचा असलेला व्यापक अर्थ विचाराकडे अत्यंत संकुचित दृष्टीने पाहिले जाते. शिक्षणाची आस खर्या अर्थाने जाणून घेणे आणि व्यापक अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न आपल्या भारतीय तत्त्वज्ञांनी अनेकदा केला. आपले संत, ऋषी, मुनी, तत्त्वज्ञांनी ज्ञानाची वाट दाखवण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांच्या नजरेत आणि दृष्टिकोनात, विचारधारेत असलेल्या शिक्षण विचाराची वाट आपल्याला आजवर चालता आलेली नाही. खरेतर कधीकाळी कोणत्याही स्वरूपाच्या ज्ञानप्राप्तीच्या सुविधा आणि जगाशी संपर्क साधण्याची साधने अथवा इतर ज्ञानाचे स्रोत उपलब्ध नसताना देखील त्यांना शिक्षणाचा मूलभूत अर्थ सापडला होता. वर्तमानात मात्र सर्व प्रकारच्या सुविधा असताना देखील शिक्षणाचा मूलभूत अर्थ मात्र आपल्या शिक्षणातून सातत्याने हरवत चालला आहे. अलीकडे अक्षर साक्षरतेला शिक्षण मानण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मुळात शिक्षणाचा विचार हा माहितीशी जोडलेला नाही, तर ज्ञानाशी नाते सांगणारा आहे. ज्ञानाचा प्रवास विद्येच्या मार्गाने घडत असतो. वर्तमानात शिक्षणातून केल्या जाणार्या पेरणीतून विद्या साध्य होताना दिसत नाही. वर्तमानात सारे शिक्षण माहिती केंद्रित झाले आहे. व्यक्तीच्या जीवनात पंधरा–वीस वर्षांचा शिक्षण प्रवास होऊनदेखील विद्या प्राप्त होत नाही. त्यामुळे शिक्षण घेऊन आणि हाती पदव्या असूनही आपले शिक्षण टाकाऊ झाले आहे की काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



**पाठ्यपुस्तकाधारित विचारधारा**

पदवी, पदव्युत्तर पदव्या हाती घेऊनही शिक्षण म्हणून अपेक्षित विचारांचा प्रभाव मानवी जीवनाच्या वर्तनावर होताना दिसत नाही. आपल्या शिक्षणातून पाठ्यपुस्तक केंद्रित विचारधारा पुढे जाते आहे. पाठ्यपुस्तकातील धडे, कविता, प्रकरणे शिकताना केवळ माहिती वाचली जाते. वर्गात माहिती सांगितली जाते. शिकणे म्हणजे केवळ पाठ्यपुस्तक पूर्ण करणे असेच झाले आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्याची प्रक्रिया घडायला हवी. त्यासाठी शिक्षण जीवनाभिमुख असायला हवे. वर्तमानात विद्येऐवजी मार्कांचे स्थान उंचावत आहे. त्यामुळे शिक्षणात पेरल्या जाणार्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याची प्रक्रियाच घडत नाही. त्यामुळे शिक्षणाच्या पदव्या हाती असूनही त्या माहितीचे विद्येत रूपांतर होत नसल्याने व्यक्तीच्या जीवनात शिक्षणाने अपेक्षित परिवर्तन होताना दिसत नाही. मग आपल्या जीवनावर शिक्षणाचा प्रभाव पडणार नसेल, शिक्षणामुळे जीवनात वर्तन, विचार परिवर्तन होणार नसेल, तर ते शिक्षण कुचकामी नाही का? शिक्षणाचा विचार केवळ अक्षर साक्षरतेपुरता केला गेला, तर आपल्याला शिक्षणाचा परिणाम व्यक्तिगत जीवनावर प्रतिबिंबीत झालेला दिसणार नाही. त्याचप्रमाणे सामाजिक जीवन आणि राष्ट्र म्हणून देखील परिणाम दिसणार नाही. शिक्षण म्हणजे नेमके काय? हा विचार आपल्या संतसाहित्यात देखील अधोरेखित झालेला आहे.

दुर्दैवाने संत साहित्याचा विचार करताना चिंतन, मनन करण्याऐवजी केवळ पूजेपुरताच तो विचार केला जात आहे. आपला समाज संत साहित्याकडे केवळ आध्यात्मिक अर्थाने पाहत आलेला आहे. आपले संत साहित्य म्हणजे जीवनात निर्माण होणार्या अंधाराच्या वाटांचा प्रवास थांबवणारे आणि दृष्टी प्रदान करणारे साहित्य आहे. त्याचवेळी शिक्षणाचा मार्ग चालणे म्हणजे जीवनात विद्येच्या तेजाने अज्ञानाचा अंधकार नष्ट करणे आहे. त्यामुळे आपण जीवनात कोणत्या दिशेने प्रवास करायचा आहे हे समजून घ्यायचे असेल, तर जीवनात विद्येचे बोट धरून चालण्याची गरज आहे. विद्येच्या बोटाला धरून चालणारी माणसेच जीवन ज्ञान प्रकाशाच्या दिशेने घेऊन जाण्यास मदत करू शकतील. त्यामुळे शिक्षणातून माहिती पेरण्याऐवजी आपण विद्येचा विचार केला, तर खर्या अर्थाने जीवनाला अर्थ प्राप्त होईल. जे शिक्षण ज्ञानाची वाट चालण्याची क्षमता देत नाही, ते शिक्षण कुचकामी आहे. अशा शिक्षणाने केवळ पदव्या मिळतील, पण त्यातून कोणाच्याही जीवनाचा उद्धार होणार नाही. म्हणून शिक्षणाचा मूलभूत अर्थ, व्यापक दृष्टिकोन संत साहित्यात आहेच; मात्र त्यासाठी त्यादृष्टीने संत साहित्याकडे पाहण्याची दृष्टी शिक्षणातून पेरण्याची गरज आहे. आपण त्याचा शोध घेऊन त्या दिशेने चालण्याचा प्रयत्न केला, तर आपले आयुष्याचे रूपांतर जीवनात झाल्याशिवाय राहणार नाही. मुळात जीवन ही व्यापक आणि विकसित स्थिती आहे. त्याकरिता जीवनदृष्टिकोन विकसित होण्याची गरज आहे. ते काम शिक्षणातून करण्याची जबाबदारी शिक्षणात कार्यरत असलेल्या प्रत्येकाची आहे.

ज्ञानाचा प्रवास– एखादा माणूस शिक्षण संस्थांमधून अथवा एखाद्या गुरुकुलात जाऊन शिक्षण घेतो. तेथे घेतलेल्या शिक्षणाच्या जोरावर पुढे नोकरी मिळवतो किंवा एखादा उद्योग सुरू करतो. काही लोक एखादी कला आत्मसात करण्यासाठी आपले आयुष्य वेचताना दिसतात. त्यासाठी ते जीवनभर समर्पणाच्या वृत्तीने प्रवास करत असतात. हा प्रवास हा ज्ञानाचा आहे. त्यामुळे आजवर ही वाट चालत ज्यांनी प्रवास केला, ते जीवनात यशस्वी झाले आहेत. हे लक्षात घेऊन शिक्षणाचे स्थान, शक्ती लक्षात घेऊन पालक, शिक्षक, प्राध्यापक आपल्या अनुभवाच्या जोरावर विद्येचे स्थान आणि जीवनातील महत्त्व ठसवत असतात. विद्येमुळेच मनुष्याला जगात श्रेष्ठत्व मिळते. जगातील जी माणसे इतिहासावर अधिराज्य करत आहेत, समाजात स्थान प्राप्त करत आहेत. ज्यांची नोंद इतिहासाने घेतली आहे, त्याचे कारण त्या माणसांची ज्ञानसाधना हेच आहे. टिळक, गांधी, सावरकर, गोखले ही माणसे म्हणजे ज्ञानसाधक होते. त्यांच्या ज्ञानसाधनेवर या देशात, समाज परिवर्तनाची वाट चालणे घडले आहे. आपल्या देशातील ज्ञानसाधकांनी अखंड जीवनभर प्रवास करत ज्याप्रमाणे इतिहासाच्या पानावर नाव कोरले, त्याप्रमाणे पाश्चात्त्य देशातही नाव कोरलेल्या अनेक ज्ञानसाधकांची वाट ज्ञान–विद्येचीच होती. अनेकांनी एका एका क्षेत्रात योगदान देऊन इतिहासावर नाव कोरले आहे. देशातील अनेक नद्यांचे नकाशे आणि माहिती मिळवत भारतीयांवर जणू उपकार करणारे प्रो.कॉटन यांना ज्ञानवाटेचे प्रवासी म्हणूनच त्यांची नोंद घेतली गेली आहे.

आपल्याला जीवनात जे काही भौतिक सुख हवे आहे. त्याकरिता आपल्याला आर्थिक सुबत्ता हवी असणार आहे. किंबहुना ऐहिक सुखाची इच्छांची पूर्ती ज्या धनाच्या साहाय्याने होत असते, ते धनही विद्येमुळे माणसाला प्राप्त होते. त्यामुळे मनुष्याच्या सर्वांगीण उत्कर्षाकरिता त्याने कोणती ना कोणती विद्या मिळवणे अत्यावश्यक आहे असे म्हटले जाते. ज्यांना कोणत्याही प्रकारची विद्या साध्य करता आलेली नाही, त्यांच्या जीवनातील आनंद हरवलेला आपणास दिसतो आहे. विद्येच्या अभावी प्रत्येकाच्या जीवनात दुःख येते हे महात्मा जोतिबा फुले यांनी म्हटले आहे. विद्येविना मती गेली/मतीविना नीती गेली/नीतीविना गती गेली/गतीविना वित्त गेले/वित्ताविना शुद्र खचले/एवढे सारे एका अविद्येने केले. माणसांच्या आयुष्यातील विद्येचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे महात्मा फुले यांनी वरील शब्दातून व्यक्त केले आहे. विद्या म्हणजे केवळ पुस्तकातील माहिती नाही. जेथे विद्या नाही, तेथे बुद्धी मिळण्याची शक्यता नाही. बुद्धी नाही म्हटल्यावर नीतीच्या वाटेचा प्रवास घडण्याची शक्यता नाही. नीती नसेल, तर जीवनात गतिशीलतेचा प्रवासही शक्य नाही. एका अर्थाने विद्या नसेल, तर वित्त, आर्थिक सुबत्ता मिळण्याची शक्यता नाही. शिक्षणाच्या मार्गाने वित्त नेमके मिळवण्याचे मार्ग आणि तेही नैतिक, अनैतिक कोणते याचा अंदाज येण्यास मदत होत असते. जेव्हा आपल्या आयुष्यात वित्त नाही, तेव्हा जीवन निरर्थक आहे असेच म्हणावे लागेल. वित्त नाही म्हणजे दुर्बलतेची वाट आपोआप चालणे घडत जाते. त्यामुळे जीवनाची वाट प्रगतीच्या दिशेने घेऊन जायची असेल, तर विद्येची नितांत गरज आहे. विद्या प्राप्त करायची असेल, तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.

पुस्तकी ज्ञान –खरेतर अनेकदा विद्येचा संबंध अध्यात्माशी जोडला जातो. आध्यात्मिक दृष्टिकोनातून विचार केला, तर विद्येचा नेहमी परिचित असणारा अर्थ अपेक्षित नाही हे लक्षात येईल. हा दृष्टिकोन अगदी उपनिषदांपासून चालत आलेला आहे. 'ईशावास्योपनिषदा'त विद्या आणि अविद्या या दोहोंचे ज्ञान असणे म्हणजे विद्या असे मानले जाते. 'विद्या' या शब्दाचा अर्थ म्हणजे ज्ञान, शिक्षण किंवा माहिती असा अधोरेखित करण्यात आला आहे. हे ज्ञान पुस्तकी असू शकते किंवा अनुभवातून मिळवलेले असू शकते. पुस्तकातील माहितीच्या संदर्भाने चिंतन, मनन करण्याचा प्रवास जेव्हा सुरू होतो तेव्हा तो विद्येचा प्रवास म्हणायला हवा. विद्येचे काही प्रकार आहेत असे मानले जाते. त्यासंदर्भाने असे म्हटले जाते, की ज्ञान, कौशल्य,समज आणि अनुभव अशा विविध प्रकार देखील सांगितले जातात. ज्ञान जगाबद्दल आणि जीवनाबद्दल माहिती असे सांगितले जाते; मात्र ज्ञानाच्या प्रवासासाठी अखंड साधनेचा प्रवास घडायला हवा असतो. अनुभवाच्या दिशेने प्रवास करत त्यासंदर्भाने चिंतन, मननाची वाट चालण्याची गरज आहे. त्याचबरोबर कौशल्यांचा विकासही त्यातून अपेक्षित आहे. काहीतरी करण्याची क्षमता जसे की, वाचन, लेखन, किंवा गणित सोडवणे ही कौशल्ये मानली जातात; मात्र त्यापलीकडे जीवनाला सामोरे जाण्यासाठी आणि जीवन विकासाच्या दृष्टीने देखील काही कौशल्य हवी असतात. ती कौशल्य आपण आत्मसात करायची आहे असे म्हटले, तर जीवनाचा प्रवास उत्तम शिक्षणाच्या वाटेनेच घडण्याची गरज आहे. याकरिता विविध घटना, प्रसंग, आशय, माहिती, गोष्टींमधील संबंध आणि अर्थ समजून घेणे आणि त्या अनुषंगाने अनुभव घेणे, प्रत्यक्ष कृतीतून शिकणे महत्त्वाचे असते. त्यातून आपण ज्ञानाच्या वाटेवरचा प्रवास करत असतो. अनुभवातून मिळणार्या विद्येच्या माध्यमातून आपले जीवन फुलणे आणि बहरणे घडते. विद्या आपल्याला अधिक सक्षम बनवते आणि चांगले जीवन जगण्यास मदत करते.

समर्थ रामदास एका समासातील श्लोकांमध्ये म्हणतात की, विद्या असूनि आचरण नाही/ते विद्या न म्हणावी काई/आचरणी जो उत्तरे/ तोचि ज्ञानी खरे. समर्थांनी विद्येचे महत्त्व अधोरेखित करताना ज्ञानमार्गाची वाट दाखवली आहे. आपल्याकडे विद्या आहे; पण त्याप्रमाणे आचरण नाही. असे असेल तर, ती विद्या नाहीच. ती केवळ माहिती आहे. माहिती कोणाच्याही जीवनात परिवर्तन घडवून आणत नाही. विद्येची वाट असेल तर जीवनात सामर्थ्य मिळत जाते. त्यातून विवेक, शहाणपणाची वाट चालणे घडत असते. विवेकाची वाट चालणे घडले की, योग्य दिशेचा प्रवास करणे घडत जाते. त्यामुळे विद्येचा प्रवास घडवते ते खरे शिक्षण. ती वाट ज्ञानाची ठरते. ती वाट म्हणजे जीवन प्रकाशाची वाट आहे. त्यामुळे समर्थांनी जे सांगितले आहे त्या वाटेचा प्रवास घडेल, तर प्रत्येकाच्या जीवनात ज्ञानप्रकाशाची वाट सापडेल आणि ती सापडली तर परिवर्तन घडणे अटळ आहे.


**संदीप वाकचौरे**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...स्पिनिंग –या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते.


## २ Joke विनोद






चल माझा टॉप काढ...
एका मुलीने आपल्या बॉयफ्रेंडला सरळ आपल्या खोलीत नेले.
मुलगी – चल माझा टॉप काढ...
थांबलास का...स्कर्टपण काढ.... आणि यापुढे माझे कपडे घालण्याचा प्रयत्न करू नको...

## ३ Message संदेश



Akshay's New Movie "Toilet" Ko Dekhny K Liye Aap Friends Ko Kese Kahen Gy?? "Chalo Toilet Dekhny Chalte Hen." ..Aur Maza To Tab Aayega Jab Aap Apna Whatsapp Status Updates Karengy.. "At Toilet With GF And Two Other Friends."

## ४ Thought सुविचार




विचार केल्याशिवाय लिहिता येत नाही.
- डॉ. ग. श्री. खैर

**संस्कृत सुभाषित**

**आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदुःखयोः।**
**तस्माच्छ्रेयस्करं मार्गं प्रतिपद्येत् न त्रसेत्॥**

**अर्थ :** आरोग्य आणि आजार, सुख आणि दुःख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या–चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत–बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म–मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### वूमन्स प्रीमिअर लीगमधल्या संघांचे मालक कोण आहेत?

नवी दिल्ली–वूमन्स प्रीमिअर लीग स्पर्धेचा चौथा हंगाम काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाने २ नोव्हेंबर रोजी नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेला नमवत विश्वविजेतेपदावर कब्जा केला. ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडची जेतेपदावरची सद्दी मोडून काढत भारताने जेतेपदावर नाव कोरलं. जेतेपदासह या भारतीय महिला क्रिकेटपटूंचं आयुष्य बदलून गेलं आहे. जेतेपदाच्या हृदय आठवणी ताज्या असतानाच भारतासह जगभरातल्या महिला क्रिकेटपटू वूमन्स प्रीमिअर लीगच्या नव्या हंगामासाठी सज्ज झाल्या आहेत. यंदाच्या हंगामातले सामने नवी मुंबईतल्या डीवाय पाटील मैदान तसंच बडोद्यात होणार आहेत. नवी मुंबईत होणाऱ्या सलामीच्या लढतीत मुंबई इंडियन्ससमोर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचं आव्हान असेल. ९ ते १७ जानेवारी या कालावधीत नवी मुंबईत ११ लढती असतील तर पुढच्या ११ लढती बडोद्यात होणार आहेत. यामध्ये प्लेऑफ्सचाही समावेश आहे.

### भारतीय अँकरला बांगलादेशने बीपीएल मधून काढले?

मुंबई –भारतीय क्रिकेट बोर्ड आणि बांगलादेश क्रिकेट बोर्ड यांच्यात मागील काही दिवसांपासून तणाव वाढला आहे. बांगलादेशचा खेळाडू मुस्तफिजूर रहमानला आयपीएल २०२६ मधून बाहेर करण्यात आलं. त्यानंतर अशा बातम्या येत होत्या की भारतीय अँकर रिद्धिमा पाठक हिला सुद्धा बांगलादेश प्रीमियर लीगच्या अँकरिंग पॅनलमधून बाहेर काढण्यात आलं आहे. सोशल मीडियावर ही बातमी पसरताच रिद्धिमा पाठकने स्वत: समोर येऊन या सर्व अफवांचं खंडन केलं. रिद्धिमाच्या सांगण्यानुसार तिला कोणीही काढलं नाही तर सध्या भारत बांगलादेशात यांच्यात असलेल्या राजनैतिक माहोलमुळे ते स्वत: टी–२० लीगमधून बाहेर पडले आहेत.

काय म्हणाली रिद्धिमा पाठक?

सोशल मीडियावर रिद्धिमा पाठकने स्वत: आपलं म्हणणं मांडलं. यात तिने बांगलादेशने तिला अँकरिंग पॅनलमधून काढल्याचा दावा फेटाळला आणि म्हटले की, 'गेल्या काही तासांपासून, मला बीपीएलमधून 'बाहेर' करण्यात आल्याच्या अफवा पसरत आहेत. मात्र हे खरे नाही. मी वैयक्तिकरित्या बीपीएलमधून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### टी २० वर्ल्ड कप २०२६ साठी न्यूझीलंड संघाची घोषणा

मुंबई –आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ ला ७ फेब्रुवारी पासून सुरुवात होणार आहे. यंदा ही स्पर्धा भारत आणि श्रीलंका यांच्यात संयुक्तपणे खेळवली जाईल. या स्पर्धेत एकूण २० देशांच्या क्रिकेट संघांनी सहभाग घेतला असून प्रत्येक देश स्पर्धा जवळ येऊ लागल्याने त्यांचे संघ जाहीर करत आहेत. अशातच न्यूझीलंडने टी २० वर्ल्ड कप २०२६ साठी त्यांच्या संघाची घोषणा केली आहे. वर्ल्ड कपपूर्वी भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात जानेवारी महिन्यात टी २० सीरिज खेळवली जाणार आहे. न्यूझीलंडने मिचेल सँटनर यांच्याकडेच टी २० वर्ल्ड कपसाठी संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी दिली आहे. मिचेल सँटनर हा त्याचा नववा आयसीसी वर्ल्ड कप खेळणार आहे.

**जॅकब डफी असू शकतो ट्रंप कार्ड :**आयसीसी टी २० क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाचा गोलंदाज जॅकब डफी सध्या न्यूझीलंडसाठी उत्तम फॉर्ममध्ये आहे. त्याने २०२५ मध्ये एकूण ३६ सामने खेळले होते ज्यात त्याने १७ च्या स्ट्राईक रेटने एकूण ८१ विकेट घेतल्या. यासह त्याने सर रिचर्ड हॅडली यांचा ७९ विकेटचा ४० वर्षे जुना रेकॉर्ड मोडला.

### जेकब बेथेलच्या शतकानंतरही इंग्लंडचा संघ बॅकफूटवर

सिडनी–ऑस्ट्रेलिया आणि इंग्लड क्रिकेट संघात सुरु असलेल्या कसोटी मालिकेतील सिडनी कसोटीचा चौथ्या दिवसाचा खेळ संपला आहे. दिवसाचा खेळ थांबला तेव्हा इंग्लंडनं त्यांच्या दुसऱ्या डावात ८ गडी गमावून ३०२ धावा केल्या होत्या. पाहुण्या संघाकडून जेकब बेथेलने १४२ धावा केल्या आणि मॅथ्यू पॉट्स शून्य धावांवर नाबाद राहिला. इंग्लंडकडे आता ११९ धावांची आघाडी आहे, परंतु फक्त दोन विकेट्स शिल्लक असल्याने, शेवटचा दिवस त्यांच्यासाठी आव्हानात्मक ठरु शकतो.बेथेलचे शानदार शतक : चौथ्या दिवसाचा ब्लॉकबस्टर क्षण म्हणजे जेकब बेथेलचे शानदार शतक, ज्यानं सिडनी क्रिकेट ग्राउंडवरील प्रेक्षकांचे पूर्णपणे मनोरंजन केले. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पहिले शतक होते, जे त्याने १६२ चेंडूत पूर्ण केले. तो सध्या १५ चौकार आणि २३२ चेंडूंत १४२ धावांवर नाबाद आहे. कसोटीच्या पाचव्या दिवशी मोठी धावसंख्या उभारण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल.

ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव : दरम्यान चौथ्या दिवशी, ऑस्ट्रेलियाने ७५१८ वर खेळ सुरु.

## अ‍ॅशेसमध्ये हेडचे दिडशतक; स्मिथचे शतक

सिडनी : ऑस्ट्रेलियाच्या संघाचा कार्यवाहू कर्णधार स्टीव्ह स्मिथ याने अ‍ॅशेस कसोटी मालिकेतील पाचव्या आणि अखेरच्या सामन्यातील तिसर्या दिवसाच्या खेळात शतक साजरे केले. फेब्रुवारी २०२५ नंतर १३ डावांनंतर त्याच्या बॅटमधून शतकी खेळी पाहायला मिळाली. कसोटी कारकिर्दीतील ३७ व्या आणि अ‍ॅशेस कसोटीतील १३ व्या शतकासह त्याने मोठा डाव साधला आहे. या कामगिरीसह अनेक विक्रम मोडीत काढताना त्याने भारताचा माजी क्रिकेटर राहुल द्रविडलाही मागे टाकले आहे.स्टीव्ह स्मिथचे आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या इतिहासातील हे १४ वे शतक ठरले. यासह त्याने शुभमन गिल (१० शतके) याच्यासह अनेक दिग्गजांना मागे टाकले. तसेच केन विल्यमसन, ट्रॅव्हिस





हेड आणि मार्नस लाबुशेन (प्रत्येकी ११ शतके) यांनाही त्याने मागे टाकले आहे.

इतिहासात सर्वाधिक शतके झळकवणारे फलंदाज
जो रूट (इंग्लंड) – २३
स्मिथ(ऑस्ट्रेलिया) – १४
विल्यमसन(न्यूझीलंड)– ११
ट्रॅव्हिस हेड(ऑस्ट्रेलिया) – ११ मार्नस लाबुशेन (ऑस्ट्रेलिया) ११
शुभमन गिल (भारत) १०
हॅरी ब्रूक (इंग्लंड)– ९
रोहित शर्मा (भारत) ९

मध्ये सर्वाधिक धावा करणार्यांच्या यादीत स्टीव स्मिथ दुसर्या क्रमांकावर आहे. त्याच्या नावावर आतापर्यंत ४५२४ धावा* जमा आहेत.

जो रूट – ६४७४ धावा
स्टीव्ह स्मिथ– ४५२४* धावा
मार्नस लाबुशेन– ४४४७ धावा
ट्रॅव्हिस हेड– ३९०० धावा
बेन स्टोक्स – ३७९९ धावा

**सर्वाधिक कसोटी शतके झळकावणारे फलंदाज**
५१– सचिन तेंडुलकर
४५– जॅक कॅलिस
४१ –रिकी पाँटिंग
४१ – जो रूट
३८ – कुमार संगकारा
३७– स्टीव्ह स्मिथ
३६– राहुल द्रविड

राहुल द्रविडलाही टाकले मागे

कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे आहे. मास्टर ब्लास्टर सचिनने आपल्या कसोटी कारकिर्दीत ५१ शतके झळकावली आहेत. ३७ व्या शतकासह या यादीत स्टीव्ह स्मिथ सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. सिडनी कसोटीत झळकावलेल्या शतकासह त्याने राहुल द्रविडला मागे टाकले आहे. द्रविडनं आपल्या कसोटी कारकिर्दीत ३६ शतके झळकावल्याचा रेकॉर्ड आहे.पाचव्या कसोटीतील तिसर्या दिवसाअखेर ऑस्ट्रेलियन संघाने ७ विकेट्सच्या मोबदल्यात ५१८ धावा करत सामन्यात १३४ धावांची आघाडी घेतली होती. स्टीव्ह स्मिथ २०५ चेंडूत १२९ धावांवर खेळत होता. दुसर्या बाजूला वेबस्टर ५८ चेंडूत ४८ धावांवर खेळत होता.





## रोहित भैय्या, वडापाव पाहिजे का? चाहत्याची मराठीमध्ये ऑफर

### हिटमॅनचे भन्नाट उत्तर

मुंबई–न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे सीरिज आधी रोहित शर्मा जोरदार सराव करत आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईसाठी दोन मॅच खेळलेला रोहित रविवारपासून न्यूझीलंडविरुद्धच्या सीरिजसाठी मैदानात उतरेल. या सीरिजसाठी सराव करत असताना रोहित शर्माला चाहत्याकडून वडा पावची ऑफर देण्यात आली, पण ही ऑफर रोहित शर्माने नाकारली. टेस्ट आणि टी–२० आंतरराष्ट्रीय मधून निवृत्त झाल्यापासून, रोहितचे लक्ष त्याच्या फिटनेसवर आहे. मागच्या काही काळात रोहितने त्याचं वजन कमालीचं कमी केलं आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओमध्ये, रोहित सराव सत्रासाठी तयार होताना दिसत होता, तेव्हा एका चाहत्याने त्याला मराठीत विचारले की त्याला वडा पाव खायला आवडेल का. ''रोहित भैया, वडापाव पहिजे का?'' असे चाहत्याने म्हटले. पण, रोहितने चाहत्याची ही ऑफर नाकारली आणि नाही म्हणत हात हलवला.रोहित शर्मासाठी २०२५ हे वर्ष संस्मरणीय ठरले. कर्णधार म्हणून रोहित शर्माने भारताला चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकवून दिली. फायनलमध्ये रोहितने ७६ रनची महत्त्वाची खेळी केली. रोहित शर्मा हा त्याच्या कारकिर्दीमध्ये पहिल्यांदाच आयसीसी क्रमवारीमध्ये पहिल्या क्रमांकावर पोहोचला. तसंच वनडेमध्ये सर्वाधिक रन करणारा भारताचा तिसरा खेळाडू बनला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २० हजार रन करणारा रोहित चौथा भारतीय क्रिकेटपटू ठरला. गेल्या महिन्यात विशाखापट्टणम येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या वनडे सामन्यात त्याने ही कामगिरी केली.रोहित शर्माने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सीरिजमध्येच वनडे आंतरराष्ट्रीय सामन्यात सर्वाधिक सिक्स मारण्याचा शाहिद आफ्रिदीचा विक्रमही मोडला. शाहिद आफ्रिदीचा वनडे क्रिकेटमधल्या ३५१ सिक्सचा विक्रम रोहिते मोडित काढला. रोहितने २७९ वनडे सामन्यांमध्ये ३५५ सिक्स मारले आहेत.

## वैभव सूर्यवंशीचे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतक

### दक्षिण आफ्रिकेविरुद्ध शतकी खेळी करताच रचला इतिहास





बेनोनी–वैभव सूर्यवंशीने दक्षिण आफ्रिकेत शानदार शतक ठोकून

पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. डावखुरा सलामीवीर वैभवनं बेनोनी इथं झालेल्या भारत अंडर–१९ आणि दक्षिण आफ्रिका अंडर–१९ यांच्यातील तिसऱ्या वनडे सामन्यात ६३ चेंडूत शतक ठोकले. युवा वनडे सामन्यात सूर्यवंशीचं हे तिसरं शतक होतं. या खेळीसह सूर्यवंशी युवा वनडे सामन्यात शतक करणारा सर्वात तरुण अंडर–१९ कर्णधार बनला. भारतीय संघाचे नेतृत्व करणारा सूर्यवंशी ७४ चेंडूत १२७ धावा काढून बाद झाला, त्यात त्याने १० षटकार आणि नऊ चौकार मारले. या मालिकेत वैभव भारत अंडर–१९ संघाचे नेतृत्व करत आहे, ही त्याची पहिलीच वेळ आहे. भारताची मालिकेत विजयी आघाडी : वैभव

#### ६३ चेंडूत शतक

सूर्यवंशीने २४ चेंडूत आपलं अर्धशतक पूर्ण केले. भारताच्या डावाच्या २६व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर बाद होण्यापूर्वी त्याने आरोन जॉर्जसोबत पहिल्या विकेटसाठी २२७ धावा जोडल्या. सूर्यवंशी लवकरच भारतीय वरिष्ठ क्रिकेट संघात पदार्पण करु शकतो. त्याआधी, ५ जानेवारी रोजी खेळल्या गेलेल्या दुसऱ्या युवा वनडे सामन्यात सूर्यवंशीने २४ चेंडूत ६८ धावा केल्या, ज्यामध्ये १० षटकारांचा समावेश होता. त्याच्या शानदार खेळीमुळे भारताने १९ वर्षांखालील संघाला डीएलएस पद्धतीने आठ विकेट्सने विजय मिळवून युवा वनडे मालिकेत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २–० अशी विजयी आघाडी मिळवून दिली. वैभव सूर्यवंशीने कुठे–कुठे शतके केली? : वैभव सूर्यवंशीने यापूर्वी कतार, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये शतके केली आहेत. त्यानं आयपीएलमध्येही शतक केलं आहेत. बिहारच्या या युवा क्रिकेटपटूने आयपीएलमध्ये सर्वात जलद भारतीय शतकाचा विक्रम केला आहे. त्याने युवा वनडे सामन्यात इंग्लंडविरुद्ध आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध युवा कसोटीतही शतक केले आहे. वैभवने भारत अ संघासाठीही शतक केले आहे. त्याने आशिया कपमध्येही शतक केले आहे आणि विजय हजारे ट्रॉफीमध्येही त्याने बिहारसाठी शतक केले आहे.भारताचे १९ वर्षांखालील विश्वचषकातील वेळापत्रक : पाच वेळा विजेता भारत (२०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२) न्यूझीलंड, अमेरिका आणि बांगलादेशसह गट ब मध्ये आहे. भारत १५ जानेवारी रोजी क्वीन्स स्पोर्ट्स क्लब, बुलावायो इथं अमेरिकेविरुद्ध आपली मोहीम सुरु करेल. त्यानंतर १७ जानेवारी रोजी त्याच ठिकाणी बांगलादेशविरुद्ध आणि २४ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्ध सामने होतील.

## कार्तिक आर्यनसोबत डेटिंगच्या अफवांवर मिस्ट्री गर्लने केला खुलासा !

मुंबई –बॉलिवूडमध्ये अफवांचा बाजार चित्रपटांच्या बॉक्स ऑफिसपेक्षा कधी कधी वेगाने गाजतो आणि २०२६ हे वर्षही त्याला अपवाद ठरलेलं नाही. वर्षाच्या सुरूवातीसच अभिनेता कार्तिक आर्यनचं नाव चर्चेत आलं आहे, आणि तेही त्याच्या गोव्यातील काही फोटोमुळे. कार्तिकचा २०२५ साली रिलीज झालेला चित्रपट मतू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरीफ बॉक्स ऑफिसवर अपेक्षित प्रतिसाद देऊ शकला नाही, तरीही कार्तिक अजूनही लाइमलाईटमध्ये आहे त्याचे नाव आता त्याच्या पर्सनल लाईफमुळे चर्चेत आहे.गेल्या काही दिवसांत कार्तिकने सोशल मीडियावर गोव्यातील व्हेकेशनचे फोटो शेअर केले. फोटोमध्ये कार्तिक समुद्रकिनारी आराम करत आणि चिल करत दिसतोय. मात्र, चाहत्यांची लक्ष वेधली गेली फोटोच्या बॅकग्राऊंडकडे. काही युजर्सनी असा दावा केला की कार्तिकच्या फोटोमधील सीन आणि एका मुलीच्या फोटोमध्ये खूप साम्य आहे. यामुळे त्याच्या डेटिंग लाइफबाबत चर्चा रंगली. ज्या मुलीशी कार्तिकचं नाव जोडलं जात आहे, तिचं नाव करीना कुबिलियूते असं सांगितलं जात आहे. रिपोर्ट्सनुसार करीना ग्रीसची असून सध्या यूकेमध्ये शिक्षण घेत आहे. सोशल मीडियावर चाहत्यांनी दोन्ही फोटोंमधील समुद्राचा अँगल, बेडची जागा, समुद्रकिनाऱ्यावरील फ्रेम आणि अगदी टॉवेलची स्थिती यांची तुलना केली.

## जेतेपद पटकावण्यासाठी आम्ही वर्ल्ड चॅम्पियन झाल्यानंतर काय बदल झाले; हरमनप्रीत

दिल्ली–वुमन्स प्रीमियर लीग २०२६ अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. येत्या ९ जानेवारीपासून डब्ल्युपीएल २०२६ला सुरूवात होत आहे. पहिलाच सामना मुंबई इंडियन्स व रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होईल. यापूर्वी मुंबई इंडियन्स संघाची पत्रकार परिषद पार पडली. यादरम्यान वर्ल्ड चॅम्पियन कर्णधार हरमनप्रीत कौरने वर्ल्डकप जिंकल्यानंतर काय बदल झाला हे सांगितले.

मुंबई इंडियन्सच्या पत्रकार परिषदेसाठी मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौर, नवीन कोच लिसा केइटली आणि गोलंदाजी कोच झुलन गोस्वामी उपस्थित होत्या. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने वनडे विश्वचषक २०२५ चे जेतेपद पटकावलं. मुंबईतील डी वाय पाटील स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात संघाने हा दणदणीत विजय मिळवला.





विश्वचषक जिंकल्यानंतर आयुष्य काय बदल झाले? यावर हरमनप्रीत कौर म्हणाली, ''पूर्वीपेक्षा जास्त बिझी झालीये. नाहीतर प्रत्येक वर्ल्डकपनंतर काही न करता घरात बसून असायची. पण वर्ल्डकप जिंकल्यानंतर आता खूप बिझी झालीये, कारण सर्वांना जाणून घ्यायचं आहे की हा सीझन कसा होता, आम्ही कसा विचार करत होतो, नेमकं काय केलंष्ठ जेतेपद पटकावण्यासाठी आम्ही कशी तयारी केली., हे सर्वांना जाणून घ्यायचं आहे. खूप बिझी आहे खरंतर पण मी एन्जॉय करतेय.''हरमनप्रीत कौरने मुंबई इंडियन्सला स्पर्धेचे दोन वेळा जेतेपद पटकावून दिलं आहे. यानंतर आता हरमनच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने वर्ल्डकप देखील जिंकला. ही तिन्ही जेतेपद हरमनने मुंबईत पटकावली. मुंबईत तू तुझं बेस्ट क्रिकेट खेळतेस, याबद्दल काय सांगशीलष्ठ यावर बोलताना हरमन म्हणाली, ''मुंबई माझ्यासाठी कायमच खास शहर राहिलं आहे. माझा पहिला जॉबसुद्धा मुंबईतच होता. मुंबई माझ्यासाठी स्पेशल शहर आहे. जेव्हाही मुंबईत सामना खेळण्याची संधी मिळाली आहे, तेव्हा नेहमीच सकारात्मक निर्णय पाहायला मिळाला आहे. यंदाच्या वुमन्स प्रीमियर लीगची सुरूवात सुद्धा मुंबईतच होत आहे. त्यामुळे हे वर्षसुद्धा स्पेशल असणार आहे. गेले पूर्ण वर्ष महिला क्रिकेटसाठी खूप चांगले ठरले. हे वर्षदेखील असेच असेल अशी आशा करते.''

## घटस्फोटाच्या ११ महिन्यांनी युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा पुन्हा एकत्र दिसणार?



मुंबई–भारताचा स्टार क्रिकेटर युजवेंद्र चहल आणि त्याची पूर्व पत्नी कोरिओग्राफर धनश्री वर्मा या दोघांनी २०२५ मध्ये घटस्फोट घेतला. मात्र आता घटस्फोटाच्या जवळपास ११ महिन्यांनी दोघे एकत्र एका रिॲलिटी शोमध्ये दिसू शकतात. मार्च महिन्या युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा हे दोघे विभक्त झाले. त्यांच्या घटस्फोटाची खूप चर्चा झाली होती, मात्र आता हे दोघे मद ५०फ या रिॲलिटी शोमध्ये दिसू शकतात अशी चर्चा आहे.

सलमान खान ने त्याच्या प्रसिद्ध रिॲलिटी शो दरम्यान मद ५०फ या शोबाबत बोलला होता. ज्यात वेगवेगळ्या क्षेत्रातील पर्सनालिटी येतील. जर रिपोर्ट्सनुसार युजवेंद्र चहल आणि त्याची पूर्व पत्नी धनश्री वर्मा हे दोघे या शो मध्ये एकमेकांसमोर आल्यास ड्रामा पाहायला मिळू शकतो. मद ५०फ हा शो भारतात १ फेब्रुवारी पासून सुरु होणार आहे.

२०२५ मध्ये चहल आणि धनश्रीचा घटस्फोट : युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा या दोघांची लॉकडाउनमध्ये ओळख झाली होती. २०२० मध्ये दोघांनी लग्न केलं, धनश्री चहल ही लॉकडाउनमध्ये चहलला डान्स शिकवायची. इथूनच दोघांचे सूर जुळले. धनश्री वर्मा अनेकदा स्टेडियममध्ये युजवेंद्र चहलला चिअर करताना दिसून यायची. मात्र अशातच २०२४ मध्ये दोघांमध्ये सगळं काही आलबेल नसल्याची माहिती समोर आली आणि त्याच्या काही दिवसातच दोघांचा घटस्फोट झाला.

आरजे महवशला डेट करतोय चहल?

धनश्री वर्मा सोबत विभक्त झाल्यावर क्रिकेटर युजवेंद्र चहल हा आरजे महवश हिला डेट करतोय अशी चर्चा आहे. अनेकदा दोघांना एकत्र पाहण्यात आलंय. आरजे महवश ही स्टेडियममध्ये चहलला सामन्यादरम्यान चिअर करताना दिसली. दोघांना बऱ्याचदा एकत्र स्पॉट करण्यात आलं, त्यामुळे दोघे एकमेकांना डेट करत असल्याचं बोललं जातंय.

चहलने धनश्रीला दिली चार कोटींची पोटगी: क्रिकेटर युझवेंद्र चहल आणि पूर्व पत्नी धनश्री वर्मा यांचा फेब्रुवारी २०२५ रोजी घटस्फोट झाला. दोघांनी २०२० मध्ये लग्न केलं होतं. मात्र त्यांचं लग्न केवळ १८ महिने चाललं आणि त्यांच्या नात्यात सर्वकाही ठीक नव्हतं त्यामुळे २०२२ पासून ते वेगळे राहत होते अशी माहिती कोर्टात सादर करण्यात आली. अखेर मुंबई कौटुंबिक न्यायालयाने या दोघांच्या घटस्फोटावर निर्णय दिला आणि दोघे विभक्त झाले. त्यांच्या घटस्फोटानंतर दोघे वेगळे का झाले याची अनेक कारण समोर आली. घटस्फोटानंतर चहलने धनश्रीला पोटगीत ४ कोटी रुपये दिले.

घटस्फोटाचं कारण काय होते?

धनश्री वर्मा ही घटस्फोटानंतर एका रिॲलिटी शो मध्ये गेली होती. यात तिने एका स्पर्धकाशी बोलताना सांगितले होते की, लग्नाच्या काही महिन्यांनी तिने युजवेंद्रला तिच्या सोबत चिट करताना पकडले होते. तर काही मीडिया रिपोर्ट्समध्ये असं देखील सांगण्यात आले की धनश्रीला मुंबईला राहायची इच्छा होती, आणि तिला असं वाटत होते की चहलने त्याच्या हरियाणातील कुटुंबाला सोडून तिच्या सोबत मुंबईत शिफ्ट व्हावे. या दोघांवरून दोघांचे भांडण झाले आणि मग ते प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचले.

# हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेडमधील भव्य कार्यक्रम यशस्वी करण्याचे निर्देश -मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

## कार्यक्रमासाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना - सचिव रुचेश जयव



मुंबई/नांदेड, दि. ७ जानेवारी– 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाचे सर्वांगीण व काटेकोर नियोजन करण्यात यावे. देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावरून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असून, त्यांच्या सुरक्षा, वाहतूक, वैद्यकीय सेवा व मूलभूत सोयी–सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिल्या.

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या या भव्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीस अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव रूचेश जयवंशी, राज्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीव्दारे छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव, जळगाव, धुळे, नंदूरबार जिल्हयाचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालीका आयुक्त, शिक्षण, परिवहन, अल्पसंख्याक विभागाचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्रीकर परदेशी म्हणाले की, या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरून श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांना मानणारे लाखो भाविक नांदेडमध्ये येणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मिकी, भगत नामदेव व उदासीन असे नऊ समाज–संप्रदाय एकत्र येणार आहेत.

श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या त्याग, बलिदान व मानवतेसाठी दिलेल्या शहीदीचा इतिहास देश–विदेशात पोहोचवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी २६ विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सुमारे १० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन चोख सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, वाहतूक नियोजन, निवास व्यवस्था, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आदी मूलभूत सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

युवकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध व वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच भाविकांच्या सोयीसाठी https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर रस्ते, रेल्वे, बस, वाहतूक व्यवस्था तसेच कार्यक्रमासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समितीच्या समन्वयाने सर्व यंत्रणांनी आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी सचिव रुचेश जयवंशी यांनी सांगितले की, मराठवाडा विभागातील सर्व जिल्हे, महानगरपालिका, शाळा–महाविद्यालये, पोलीस यंत्रणा व परिवहन विभागाने समन्वयाने काम करत भाविकांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात तसेच सुरक्षेच्या दृष्टीने काटेकोर कार्यवाही करावी.

रामेश्वर नाईक म्हणाले की, श्री गुरु तेग बहादुर यांनी राष्ट्र व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान सर्वसामान्य जनतेपर्यंत, विशेषतः गावपातळीवर विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वोत्तम संस्था आणि विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. असेही त्यांनी सांगितले.

**हिंद–दी–चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी शहीदी समागम कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशासन सज्ज जिल्हाधिकारी राहूल कर्डिले**

हिंद–दी–चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागमाच्या यशस्वी भव्य आयोजनासाठी नांदेड जिल्हा प्रशासनामार्फत एकूण २५ समित्या स्थापन करण्यात आल्या असून प्रत्येक समिती प्रमुखांवर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. सर्व यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. शहीदी समागम कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी यावेळी दिली.

सदर बैठकीसाठी दुरदृश्य प्रणालीव्दारे नांदेड येथून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे कार्यकारी अधिकारी व शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, गुरुद्वारा बोर्डाकडून अधीक्षक हरजितसिंघ कडेवाले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, मुख्य कार्यक्रम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर होणार असून मैदानाचे सपाटीकरण व स्वच्छतेच्या कामासह मुख्य पेंडाल उभारणीसाठी आवश्यक सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. विद्युत व पाणीपुरवठ्याची व्यवस्था आज पूर्ण करण्यात येणार आहे. भाविकांसाठी जिल्हानिहाय पार्किंगची ठिकाणे निश्चित करण्यात आली असून निवासासाठी शहरातील शाळा, महाविद्यालये व मोकळ्या जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करण्यात आले असून आवश्यक वाहनांची व्यवस्था देखील करण्यात येत आहे. नांदेड हे रेल्वेमार्गावर असल्याने रेल्वे विभागाच्या सहकार्याने अधिकाधिक भाविकांना रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. लंगर, निवास व वाहतूक व्यवस्थेचा दैनंदिन आढावा घेतला जात असून आरोग्य सेवांसाठी ७२ रुग्णालयांमार्फत वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येणार आहेत. कार्यक्रमस्थळी विविध आरोग्य स्टॉल उभारण्यात येणार आहोत. स्वच्छतेसाठी सध्या १०० शौचालयांची व्यवस्था उपलब्ध आहे. यासाठी इतर जिल्ह्यांचेही सहकार्य घेतले जाणार आहे. कार्यक्रमाच्या प्रचार–प्रसिद्धीसाठी विविध शाळांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून येत्या १५ जानेवारीपासून प्रभातफेऱ्या काढण्यात येणार आहेत. तसेच होर्डिंग्सद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रचार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सुरक्षा व्यवस्था, पार्किंग व सुरक्षा पासेस याबाबतच्या नियोजनाची सविस्तर माहिती दिली.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात ७ दिवसीय करिअर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन उत्साहात



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर आणि कर्मवीर एम.पी.एस.सी. क्लासेस, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७ दिवसीय करिअर मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन एस.टी.आय. लातूर येथील शार्दुल पटेल व अरुण टोकळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कॉम्पेटिटिव्ह एक्झाम सेलच्या समन्वयिका डॉ. रूपा गिल्डा यांनी प्रास्ताविक करून शिबिरामागील उद्दिष्टे स्पष्ट केली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कर्मवीर एम.पी.एस.सी. क्लासेसचे संचालक रमेश भारती यांनी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा, त्यातील करिअर संधी तसेच यशासाठी आवश्यक असलेली अभ्यासपद्धती, सातत्य व नियोजन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. उद्घाटक अरुण टोकळे यांनी आपल्या मनोगतातून स्वतःचा जीवनप्रवास उलगडत विद्यार्थ्यांनी अडचणींवर मात करून यशाकडे वाटचाल कशी करावी, याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांचे महत्त्व ओळखून वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्पष्ट ध्येय निश्चितीवर भर द्यावा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण, एम.सी.ए. विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते तसेच प्रा. यू. व्ही. दुधभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अजय चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. कल्याणी पाटील यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.दिपाली जिरोबे व प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भाजपा उमेदवार जनतेचा विश्वास सार्थ ठरवतील -पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले



**लातूर/प्रतिनिधी:** भाजपाने जनतेचा विश्वास सार्थ ठरविणारे उमेदवार दिले आहेत. मतदारांनी स्वच्छ प्रतिमा व जनतेची कामे करणाऱ्या भाजपाच्या उमेदवारांना निवडून द्यावे,असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील प्रभाग क्रमांक १२ व प्रभाग १३ मधील उमेदवार प्रियंका गायकवाड, दीपाताई गीते, पवन आलटे,तुळसी पांचाळ, छायाताई केंद्रे, अण्णासाहेब हिप्परकर यांच्या प्रचारासाठी प्रकाश नगर मधील सरस्वती विद्यालय येथे आयोजित सभेत पालकमंत्री भोसले बोलत होते. या सभेस निवडणूक प्रमुख आ.संभाजी पाटील निलंगेकर, माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनतेला संबोधित करताना पालकमंत्री भोसले म्हणाले की, भाजपाने पुढील २५ वर्षात करावयाच्या कामांचा संकल्प केलेला आहे.विकसित भारताचा संकल्प भाजपाने केलेला असून तो पूर्णत्वाकडे नेण्यासाठी पक्षाचे हात मजबूत केले पाहिजेत.मनपाच्या माध्यमातून नगरसेवक निवडून देत दिल्ली, मुंबई आणि लातूर महानगरपालिकेतही भाजपाची सत्ता असेल तर विकासकामे गतीने होणार आहेत. आम्ही जनतेचे सेवक आहोत. आपल्या सेवेसाठी कायम तत्पर आहोत.या हेतूनेच मी येथे आलो आहे,असे प्रतिपादनही त्यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी विरोधकांना भेट आव्हान दिले. मागील काळात लातूर शहरात केलेल्या विकासकामांची माहिती त्यांनी जनतेला द्यावी, असे ते म्हणाले. शहराच्या आजूबाजूला साखर कारखाने उभारले. या कारखान्यातील सांडपाणी नद्यांमध्ये सोडले. यामुळे पाणीसाठे गढूळ झाले असून नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे, असे ते म्हणाले. केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दोन्ही सरकारकडून अधिकाधिक निधी खेचून आणु, असेही ते म्हणाले.

या सभेस भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## रासेयो तर्फे कर्करोग जनजागृती व 'संजीवनी' मुख्यमंत्री सहाय्यता निधीवर मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** ३ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने जनजागृती कार्यक्रमांतर्गत गरजू रुग्णांसाठी असलेल्या 'संजीवनी : मुख्यमंत्री सहाय्यता निधी' योजनेविषयी तसेच कर्करोग विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. विशाल वर्मा आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमात डॉ. प्रियंका राठोड यांनी कर्करोगाबाबत सखोल व उपयुक्त मार्गदर्शन केले. त्यांनी कर्करोगाचे विविध प्रकार, प्राथमिक लक्षणे, वेळेवर निदानाचे महत्त्व तसेच कर्करोग प्रतिबंधासाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती दिली. आरोग्यदायी जीवनशैली, नियमित आरोग्य तपासणी, व्यसनांपासून दूर राहणे आणि संतुलित आहार यामुळे कर्करोगाचा धोका कसा कमी करता येतो, यावर त्यांनी विशेष भर दिला. उपस्थित विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत शंका निरसन केले.

## सौ. केशरबाई भार्गव प्राथमिक विद्यालयात कला उत्सव २०२६ उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी:** सौ. केशरबाई भार्गव प्राथमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन – कला उत्सव २०२६ अत्यंत उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मुग्धा पोतदार तर अध्यक्षस्थानी कुमुदिनी भार्गव उपस्थित होत्या. श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्रद्धेय मा.लक्ष्मीरमणजी लाहोटी यांचा ही यथोचित सन्मान केला. मंचावर या सर्व मान्यवरा समवेत संस्था सचिव ॲड. आशिषजी बाजपाई,सूर्यप्रकाशजी धूत,शांतीलालजी कुचेरिया, शरदजी नावंदर,शालेय समिती अध्यक्ष कमलकिशोरजी अग्रवाल,आनंदजी लाहोटी, सुहासजी शेट्टी.आदि मान्यवर उपस्थित होते. या समवेत पालकवर्ग, शिक्षक, माजी विद्यार्थी तसेच मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन,प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. फॅमिली थीम, स्पोर्ट्स थीम, चांद्रयान, शिव–संभाजी छावा नृत्य, रामायण थीमवर आधारित नृत्य, वारकरी दिंडी, देशभक्तीपर गीत–नृत्य तसेच लहान मुलांच्या रंगतदार नृत्यांनी संपूर्ण सभागृह टाळ्या च्या गजराने दुमदुमून गेले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौं सुनीता रणदिवे यांनी तर सूत्रसंचालन स. शि.कल्पना श्याम भट्टड व रेश्मा अडाणे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. प्रमुख अतिथी डॉ. मुग्धा पोतदार यांनी विद्यार्थ्यांच्या कला–गुणांचे मनापासून कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात कुमुदिनी भार्गव यांनी शाळेच्या शैक्षणिक व सहशैक्षणिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत–सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सलगरे मॅडम यांनी आभारप्रदर्शन करून या रंगतदार कला उत्सव २०२६ ची सांगता केली.

## निवडणूक कर्तव्यावर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान सुविधा; टपाली मतदान सुविधा केंद्र स्थापन

**लातूर/प्रतिनिधी:** निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी मोठया संख्येने शासकीय – निमशासकीय कर्मचारी कार्यरत असतात. निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असताना कर्मचाऱ्यांचा मतदार म्हणून मतदानाचा हक्क डावलला जाऊ नये यादृष्टीने राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार टपाली मतदान सुविधा (Postal Ballot) महापालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीकरिता शासकीय – निमशासकीय कार्यालये, खाजगी शाळा येथील कर्मचाऱ्यांची निवडणूक कामाकरिता नेमणूक करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांकरिता तसेच जे कर्मचारी शहराचे मतदार आहेत मात्र त्यांची नेमणूक निवडणूक कर्तव्यावर इतर ठिकाणी झालेली आहे अशा कर्मचा–यांना मतदान करता यावे याकरिता लातूर शहर महानगरपालिकेच्या सहाही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयावतीने विशेष टपाली सहाय्यता मतदान कक्ष स्थापन करण्यात आला असल्याची माहिती याविषयाच्या उपायुक्त (निवडणूक) डॉ पंजाब खानसोळे यांनी दिली आहे.

याकरिता लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रात मतदार म्हणून नोंदणी असलेले अधिकारी – कर्मचारी यांनी अंतिम मतदार यादीत आपले नाव व नंबर तपासून ते ज्या प्रभागात मतदार आहेत त्या प्रभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे ८ जानेवारी २०२६ पूर्वी प्रपत्र पीबी – १ नमुन्यात आपले सूचनापत्र / अर्ज देऊन मतपत्रिकेची मागणी करावयाची आहे. यासोबत त्यांनी आपला निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती झाल्याचा आदेश जोडणे आवश्यक आहे.

त्यानंतर त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामार्फत टपाली मतपत्रिका सुविधा देण्यात येईल.. सदर मतपत्रिका व अन्य आवश्यक नमुने नियमामध्ये नमूद पध्दतीने बंद लिफाफ्यात संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडे पुन्हा जमा करणे घेण्यात येतील.

अर्जदारांना आपले टपाली मतदान नोंदविण्याकरिता मदतीसाठी सहाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या वतीने टपाली मतदान सुविधा कक्ष करण्यात आलेले आहेत त्यानुसार एकूण ३०६ कर्मचार्यांनी आतापर्यंत अर्ज केला असून त्यांचे टपली मतदान दयानंद सभागृह लातूर येथे टपाली मत दान सुविधा केंद्रात दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते ५ वेळेत करता येईल. लातूर महानगरपालिका मुख्यालय स्तरावरही विशेष टपाली मतदान सहाय्यता कक्ष स्थापन करण्यात आला असून याबाबतच्या माहिती व अडचणींसाठी ९४२३७१९००१ संतोष लाडलापुरे यांच्या कडे कार्यालयीन वेळेत संपेल करता येईल.

या बाबत सर्वच महानगरपालिकांमध्ये सुसूत्रता व समन्वय रहावा यादृष्टीने लातूर महापालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी सर्व महानगरपालिकांचे आयुक्त यांना पत्र लिहून लातूर महानगरपालिका क्षेत्रात मतदार असणारे आणि त्या महानगरपालिका कार्यालयाकडे निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असणारे अधिकारी, कर्मचारी यांच्या निदर्शनास ही बाब आणून दयावी असे पत्राव्दारे कळविले आहे. अशाच प्रकारचे पत्र पोलीस अधीक्षक लातूर यांनाही देण्यात आलेले आहे.

निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यादृष्टीने लातूर महानगरपालिकेच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व नियमानुसार टपाली मतदानाची संपूर्ण व्यवस्था करण्यात आली असून त्याचा लाभ घेऊन निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनीही लोकशाहीने आपल्याला दिलेला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन लातूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले टिकाऊ रबरी शिक्के तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## फक्त ३२८ रुपयांत ५ लाखांचे अपघात विमा संरक्षण: इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची 'ग्रुप ॲक्सिडेंट गार्ड पॉलिसी' नागरिकांसाठी वरदान

धाराशिव (जिमाका) सामाजिक सुरक्षा व आर्थिक समावेशन अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (खझझइ) मार्फत नागरिकांसाठी 'ग्रुप ॲक्सिडेंट गार्ड पॉलिसी' उपलब्ध करून देण्यात आली आहे. डाक विभाग,महाराष्ट्र सर्कल यांच्या वतीने याबाबत माहिती देण्यात आली.

ही पॉलिसी अपघातामुळे होणारा मृत्यू,अपघाती रुग्णालयात दाखल होणे तसेच कायमस्वरूपी पूर्ण किंवा अंशतःअपंगत्व अशा परिस्थितींमध्ये आर्थिक संरक्षण प्रदान करते.अत्यंत परवडणाऱ्या प्रिमियममध्ये उपलब्ध असल्याने ही योजना कामगार, शेतकरी,स्वयंरोजगार करणारे तसेच ग्रामीण व निमशहरी भागातील नागरिकांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे.या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू, रुग्णालयात दाखल झाल्यास खर्चासाठी मदत, कायमस्वरूपी अपंगत्वासाठी भरपाई तसेच मृत विमाधारकाच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध आहे. सुलभ नोंदणी प्रक्रिया व सोपी, त्रासमुक्त दावा व्यवस्था ही या योजनेची आणखी एक वैशिष्ट्ये आहेत.

या पॉलिसीसाठी वार्षिक प्रिमियम फक्त ३२८ रुपयांपासून सुरू होत असून त्यावर ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते.अधिक प्रिमियममध्ये १० लाख व १५ लाख रुपयांचे विमा संरक्षणही उपलब्ध आहे.

ही सुविधा आयपीपीबी बचत खातेधारकांना त्यांच्या नजीकच्या पोस्ट ऑफिस,पोस्टमन किंवा ग्रामीण डाक सेवक यांच्या माध्यमातून सहजपणे घेता येणार आहे. इंडिया पोस्टचे व्यापक जाळे विमा सेवा शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची ही योजना नागरिकांच्या सामाजिक सुरक्षेला बळ देणारी,आर्थिक स्थैर्य निर्माण करणारी व नागरिक-केंद्रित सेवा वितरणाचा उत्तम नमुना असल्याचे डाक विभागाने नमूद केले आहे.

## पूर्ण जिल्ह्याचे राजकारण ज्याच्या भोवती फिरते तेच राणा दादा पाटील फॉलोअप लेखी कामकाज आणि जनतेसाठी अखंड धडपड



धाराशिव (रामेश्वर डोंगरे ) धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात एक नाव कायम केंद्रस्थानी राहिले आहे ते म्हणजे आमदार राणा दादा पाटील! जिल्ह्यातील नवे तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांची थेट जोडलेले सतत कार्यरत आणि परिणामकारक नेतृत्व म्हणून राणा दादा ची ओळख आहे. कुठेही कधीही वेळ मिळेल तिथे जनतेचे प्रश्न सोडवायचे आणि ते शेवटपर्यंत कसे पोहोचवायचे याच विचारात राणा दादा नेहमी गुंतलेले असतात. राणा दादाचा एक ठाम सिद्धांत आहे लिखित मागणी आणि सातत्यपूर्ण फॉलोअप असेल तरच काम वेगाने पूर्ण होते. त्यामुळे कोणताही प्रश्न असो तो लिखित स्वरूपात घ्यायला प्राधान्य देतात जनतेच्या कामाचा पाठपुरावा लवकर आणि प्रभावी होतो, यावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे फक्तआश्वासनावर नव्हे तर कागदपत्री प्रक्रिया आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीवर त्यांचा भर असतो त्यांचे नेतृत्व केवळ स्वतः पुरते मर्यादित नाही तर नव्या पिढीला संधी देणारे आहे. अलीकडे भाजपचे नवनिर्वाचित नगरसेवक असोत किंवा तरुण कार्यकर्ते राणा दादांनी त्यांना जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीत निरीक्षक व जबाबदारीची भूमिका दिली आहे. गटनिहाय उमेदवाराची चाचणी अनुभवाची देवाणघेवन आणि नव्या दमाच्या नेतृत्वाला पुढे आणणे हा त्यांचा दूरदृष्टीचा राजकीय दृष्टीकोन स्पष्ट करतो. अनुभव प्रत्येकाचा महत्त्वाचा असतो हे राणा दादा प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देतात शेतकऱ्याचा प्रश्नाबाबत ही राणा दादाची भूमिका ठाम आणि सक्रिय आहे. केवळ धाराशिव जिल्ह्यातूनच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातून पिक विमा आणि शेतकरी विमा संदर्भात दररोज फोन येतात यावरून त्यांचे कार्यक्षेत्र किती व्यापक आहे हे दिसून येते जिल्ह्यासाठी नव्हे तर महाराष्ट्रासाठी काम करणारा नेता म्हणून राणादादाची ओळख दिवसेंदिवस अधिक ठळक होत आहे. याच कारणामुळे धाराशिवची जनता खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा आहे विकास शेतकरी सामान्य नागरिक आणि प्रशासन यांच्यात समानय सातत्याने काम करणारे राणा दादा पाटील हे आज जिल्ह्याच्या राजकारणाचे केंद्रबिंदू आहेत हे वास्तव्य विरोधकांनाही समजून घ्यायला हवं कारण आज धाराशिव चे राजकारण जर कोणाभोवती फिरत असेल तर ते फक्त राणा दादा पाटील हेच आहेत

## बसव प्रतिष्ठानच्या चले जाव सरकार मोहिमेला कळंब येथून आरंभ... होमगार्ड मागण्या घेऊन डॉ. रामलिंग पुराणे पुन्हा मैदानात...



कळंब (प्रतिनिधी)- बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान डॉ. रामलिंग पुराणे यांनी पुन्हा एकदा सरकार विरोधात आंदोलनाचा एल्गार केला आहे. महाराष्ट्र राज्यातील होमगार्ड समस्या/मागण्या घेऊन बसव प्रतिष्ठानच्या माध्यमातून सण २०१९ म्हणजेच महाविकास आघाडी सरकार काळापासून शासन दरबारी पाठपुरावा ते करीत आहेत आणि त्याच्या पाठपुराव्यामुळे अनेक मागण्या ही मंजूर झाल्या मात्र मुख्य मागण्या होमगार्ड कायद्यात बदल, ३६५ दिवस काम यासह होमगार्ड हिताचे मागण्या अद्याप प्रलंबित आहेत, त्या प्रलंबित मागण्या घेऊन महायुती सरकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अनेक वेळा निवेदन देण्यात आले त्यानंतर पुन्हा भाजप सरकार सत्तेत आले आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा चालू झाला मात्र अद्याप होमगार्ड समस्या सोडवण्यासाठी सरकार पुढाकार घेत नसल्याचे ठपका ठेवत बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी जर सरकारला जनसामान्य नागरिकांचे कामेच करायचे नसेल तर चले जाव सरकार आंदोलन मोहिमेला सुरुवात केले असून तसे खरंबरीत पत्रही दि. ०५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री यांच्याकडे पाठवण्यात आले आहे.

या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर दि. ०७ जानेवारी वार बुधवार रोजी धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील शासकीय विश्राम गृहात डॉ. पुराणे यांच्या मार्गदर्शनाखली होमगार्ड बांधवाची बैठक पार पडली आणि बसव प्रतिष्ठानच्या चले जाव सरकार मोहिमेला कळंब येथून आरंभ झाला. या बैठकीस कळंब येथील असंख्य होमगार्ड बांधव, भगिनी उपस्थित होत्या, बैठकीच्या माध्यमातून जनजागृती करत आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली आणि या आंदोलनाला उपस्थित होमगार्ड बांधवानी एकमुखाने समर्थन दर्शवीला.

महाराष्ट्र राज्यातील होमगार्ड समस्या सरकार दुर्लक्ष करत आहे व त्याचबरोबर कामचुकार अधिकाऱ्यामुळे होमगार्ड समस्या वाढत चालल्या असल्याचे ठपका ही पत्रात नमूद करण्यात आले असून राज्यातील होमगार्ड समस्या तात्काळ सोडवा अन्यथा चले जाव सरकार आंदोलन छेडण्यात येईल असा ईशाराही पत्रात देण्यात आला आहे.

## गाळमुक्त धरण व नालाखोलीकरणामुळे जलसंधारणाला चालना, ५८ कामांना निधी मंजूर : पडताळणीत अनियमितता नाही

धाराशिव, (जिमाका)- जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग,धाराशिव यांच्या कार्यालयास गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार व नालाखोलीकरण व रुंदीकरण या महत्त्वपूर्ण योजनांच्या माध्यमातून सन २०२४-२५ मध्ये पूर्ण करण्यात आलेल्या एकूण ५८ कामांचा निधी शासनाकडून प्राप्त झाला आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीमध्ये जलसंपदा विभागाची एकूण २३ कामे व जलसंधारण विभागाची एकूण ३५ कामांचा समावेश आहे.ही कामे २१ अशासकीय संस्था व १ ग्रामपंचायत यांच्यामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहेत.

या योजनांमुळे शेतकऱ्यांच्या शिवारातील पाण्याचा साठा वाढविणे, भूजल पातळी उंचावणे, शेतजमिनीतील गाळ व सुपीक मातीचा पुनर्वापर करणे तसेच पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरविणे हे प्रमुख उद्दिष्ट साध्य होत आहे.गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेमुळे धरणातील गाळ काढून तो शेतात टाकण्यात येतो,त्यामुळे धरणाची साठवण क्षमता वाढते व शेतजमिनीची सुपीकता सुधारते.तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेमुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवले जाते,पूरस्थिती कमी होते, पाणी जमिनीत मुरते व विहिरी, बोअरवेल व नदी-नाल्यांचे पाणीपातळी वाढण्यास मदत होते. परिणामी शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढून उत्पादनक्षमतेत वाढ होते.

निधी प्राप्त झालेल्या कामांची त्रयस्थ अधिकारी यांच्यामार्फत पडताळणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी दिले होते.त्या आदेशाच्या अनुषंगाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या सर्व ५८ कामांची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली असून या पडताळणीत कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही.

तरी संबंधित शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की,सदर कामांबाबत कोणतीही समस्या असल्यास त्यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग,धाराशिव यांच्या कार्यालयास तीन दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आपली समस्या सादर करावी.सादर करण्यात आलेल्या तक्रारींचे योग्य ते निराकरण करण्यात येईल.तीन दिवसांच्या प्रतीक्षेनंतर सदर कामांचा निधी वितरित करण्यात येणार आहे.

## १,६६,०५० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०६ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२१ कारवाया करुन १,६६,०५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## MEA इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पोच्या पार्श्वभूमीवर धाराशिवमध्ये शनिवारी मेळावा

धाराशिव -मराठा समाजातील उद्योजकांना जागतिक स्तरावरील व्यावसायिक संधी उपलब्ध करून देणाऱ्या मराठा आंत्रप्रेन्युअर असोसिएशन (MEA) च्या वतीने पुण्यात २७ व २८ फेब्रुवारी२०२६ व १ मार्च २०२६ महिन्यात MEA इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पो २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील मराठा व्यावसायिक तसेच उद्योजकांसाठी भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, हा मेळावा शनिवार, १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता धाराशिव शहरातील परिमल मंगल कार्यालयात होणार आहे.

२०२६ च्या पार्श्वभूमीवर MEA च्या श्री विक्रम गायकवाड, अध्यक्ष MEA, श्री उमेश सोकांडे, श्री विक्रम नरसाळे टीमने जिल्हा धाराशिव येथे मराठा समाजातील उद्योजकांना एकत्र आणणारा उपक्रम हाती घेतला असून, यावेळी MEA चा विस्तार, आगामी आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाची माहिती तसेच व्यवसायवृद्धीसाठी उपलब्ध संधींवर चर्चा होणार आहे.

मेळाव्यासाठी एन साई साखर कारखान्याचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे,दिगंबर मडके,ड. चित्राव गोरे तसेच प्रदीप मुंडे यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातील मराठा उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले असून, या उपक्रमामुळे मराठा समाजातील उद्योजकांसाठी नव्या व्यावसायिक संधींचे दालन खुले होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## मोहेकर महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिराचे उत्साहात उद्घाटन: शाश्वत विकासात युवकाची भूमिका महत्त्वाची- डॉ.अशोकराव मोहेकर




कळंब (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन डीकसळ या गावी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत गाडगे महाराज व मोहेकर गुरुजींच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पाणलोट व पडीक जमिनीचा चिरंतन विकास या विषय केंद्रित शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती डॉ.मनीषा कळसकर, जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना धाराशिव विभाग यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना त्या म्हणाल्या, राष्ट्रीय विकास व निर्माण यामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनी ची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे. आजचे विद्यार्थी हे राष्ट्र विकासाचे स्तंभ आहेत. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती रुजली पाहिजे. त्यापुढे म्हणाल्या, राष्ट्रीय विकास व निर्माण मध्ये पर्यावरणाची भूमिका अतिशय महत्त्वाचे आहे. समाज व पर्यावरण यांचा समतोल साधून राष्ट्रीय विकास व निर्माण करता येईल असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अशोकराव मोहेकर साहेब , सचिव ज्ञान प्रसारक मंडळ हे लाभले. ते म्हणाले विद्यार्थ्यांनी मोबाईल केंद्रित न राहता पुस्तक केंद्रीत राहावे. आजचा विद्यार्थी मोबाईलच्या स्क्रीन मध्ये अडकला असून त्यांनी वेळेत यामधून बाहेर पडले पाहिजे व व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले विद्यार्थ्यांनी आत्मकेंद्री न बनता ज्ञानकेंद्री बनावे. राष्ट्रीय सेवा योजना च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास करून समाजाचा विकास करता येईल असे ते म्हणाले. पर्यावरण समाज आणि विद्यार्थी या त्रिवेणी संगमातून समृद्ध देशाची प्रगती करता येईल असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. ताटीपामुल सर यांनी केले व आभार प्रा. अंकुशराव सर यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. वर्षा सरवदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ,डॉ. दत्ता साकोळे, डॉ. दादाराव गुंडरे, डॉ. दीपक सूर्यवंशी, डॉ. नामानंद साठे,डॉ. संदीप महाजन, डॉ. मीनाक्षी जाधव, श्रीमती अर्चना मुखेडकर,डॉ. जयवंत ढोले, डॉ. संजय सावंत, डॉ. चंदनशिव, डॉ. वाघमारे, प्रा.शिंपले, प्रा. दळवी, प्रा. जमले ,प्रा. तांबोळी,प्रा. शिंदे,प्रा. रोहिणी लोकरे,प्रा. पालके, प्रा. संदीप देवकते सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के डी जाधव सर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ . हेमंत चांदोरे, उपप्राचार्य जयंत भोसले, प्रा. विलास अडसूळ चे विशेष सहकार्य लाभले. तसेच व महाविद्यालयाचे अधीक्षक हनुमंत जाधव,सहाय्यक ग्रंथपाल अरविंद शिंदे श्री बंडगर व अर्जुन वाघमारे यांनी परिश्रम घेतले.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **HAJGUDE NARSHIHARANA DHANANJAY**
TO **NARSINHARANA DHANANJAY HAJGUDE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **NARSINHARANA DHANANJAY HAJGUDE**. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **HAJGUDE NARSHIHARANA DHANANJAY.**
NEW NAME:- **NARSINHARANA DHANANJAY HAJGUDE.**
Address :- DATT NAGAR, NEAR KINARA BUILDING, KAKDE PLOT, OSMANABAD DIST. OSMANABAD -413501
AADHAR NO.- 375137293253 Mob. No.-9860636103



सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649